


# मिसराचे देव स्वर्गातून येणाऱ्या वीजासारखे

एड्रिअन एबेंस

# मिसराचे देव
# स्वर्गातून येणाऱ्या वीजासारखे

Printed by

MARANATHA
MEDIA

maranathamedia.com

July, 2025

ह्या पुस्तकाचे मराठी अनुवाद भाऊ जोएल एलिझाबेथ साळवी ह्यांनी केले आहे. तसेच पुनर्वाचनासाठी ताई सुनीता मोहिते ह्यांनी मदत केली आहे.

# सामग्री

प्रस्तावना.......... 4

दगडफेकीची प्रथा.......... 6

चांगले नसलेले कायदे आणि निर्णय.......... 7

सोन्याच्या वासराच्या मुर्तीपुजेचे परिणाम.......... 11

अग्नीतून.......... 12

पापाला पापाने शिक्षा करणे.......... 13

मिश्र लोकसंख्या.......... 14

नादाब आणि अबीहू.......... 15

स्वर्गातून आलेली वीज.......... 16

संरक्षण काढून टाकणे.......... 18

देवदूतांचे विनाशकारी कार्य.......... 19

गूढतेने वेढलेल्या सैतानाचे कृत्य.......... 22

चारित्र्य आणि शक्तीचा दैवी नमुना.......... 23

आपण कसे ठरवायचे?.......... 25

दोन महिला मृत्युच्या सेवेचा खुलासा करतात.......... 25

कनानी स्त्रीचा विश्वास.......... 26

व्यभिचारी स्त्रीला कसे दगडमार करण्यात आले.......... 28

प्रभूच्या बाजूने कोण आहे?.......... 34

सामुदायिक जबाबदारी.......... 35

बेरियन होण्याचे आवाहन.......... 38

## प्रस्तावना

खरं सांगायचं तर, ज्याच्याकडे असीम सामर्थ्य आहे आणि जो अनंत ज्ञानाने विश्वाचे संचालन करतो, अशा एका परमेश्वराला खरोखर ओळखणे अशक्यच वाटतं. “देवाला शोधून कुणी ओळखू शकेल काय?” मी तर नक्कीच नाही. तरीसुद्धा, शास्त्राच्या पानांमध्ये अशी अनेक चिन्हं आहेत जी दाखवतात की, निसर्गाचा हा महान सृष्टीकर्ता स्वतःला ओळखून घेण्याची इच्छा बाळगतो आणि आपल्या स्वतःच्या हातांनी निर्माण केलेल्या सजीव प्राण्यांशी संगती करायची इच्छा देखील ठेवतो. सर्व सामर्थ्याचा आणि प्रत्येक स्रोताचा मूळ असलेला हा देव, आपल्या पुत्रामार्फत आपल्याशी बोलला आहे ज्याला त्याने स्वतः पाठवला, आपल्या महान प्रेमाचे आणि करुणेचे हृदय प्रकट करण्यासाठी.

येशू आम्हाला आश्वासन देतो की, त्यांचा पिता अगदी त्यांच्यासारखाच आहे, तसाच सौम्य, प्रेमळ, आणि आपल्यासारख्या दुर्बल, संघर्ष करणाऱ्या लोकांच्या गरजांकडे तेवढ्याच संवेदनशीलतेने पाहणारा. “मी आणि माझा पिता एक आहोत... ज्याने मला पाहिले, त्याने पित्यालाही पाहिले आहे... पिता स्वतः तुमच्यावर प्रेम करतो.” पण तरीसुद्धा, बायबलच्या पानांमधून जेव्हा आपण अशा घटना वाचतो की जिथे लोकांनी नियम मोडल्यामुळे त्यांना दगडांनी ठार मारलं गेले, अग्नीने भस्म केलं गेले, वीज पडल्यासारखं मृत्युमुखी पाडले गेले, किंवा परमेश्वराच्या तेजाच्या संपर्कात येऊन ठार झाले तेव्हा मनात शंका उरते. खरंच, अशा देवावर आपण विश्वास ठेवू शकतो काय? हा प्रश्न क्षुल्लक नाही! आपल्या अनंत भविष्याचा, शाश्वत जीवनाचा निवाडा याच गोष्टीवर अवलंबून आहे की आपण त्या एकमेव खऱ्या देवाविषयी सत्य ओळखतो काय.

'मिसराचे देव स्वर्गातून येणाऱ्या वीजासारखे' हे पुस्तक एका वेगळ्याच दृष्टीकोनातून देवाच्या न्याय आणि करुणेचे दर्शन घडवते एका बाजूला देवाचा खराखुरा आणि प्रेमळ न्याय, आणि दुसऱ्या बाजूला इस्राएली लोकांनी स्वीकारलेले पण देवाने काही काळ सहन केलेले पूर्णपणे विरोधाभासी विचार. मृत्यूदंडाची जी पद्धत इस्राएली लोकांनी स्वीकारली ती मूळ मिसरदेशात प्रचलित होती.

ही गोष्ट जुन्या करारातील अनेक खटकणाऱ्या आणि कठीण घटनांचा अर्थ समजून घेण्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. आता सर्वांनी देवाला समजून घेण्याची वेळ आली आहे, कारण त्याच्या न्यायाचा काळ येऊन ठेपला आहे. आता आपण त्याचा न्याय कसा करणार?

डॉ. गॅरी हलक्विस्ट
अटलांटा, जॉर्जिया.

## दगडफेकीची प्रथा

बायबलमध्ये नियमशास्त्राच्या पुस्तकात काही अतिशय कठोर शिक्षेची रूपरेषा दिली आहे:

“इस्राएल लोकांना आणखी असे सांग की, इस्राएल लोकांपैकी अथवा इस्राएल लोकांमध्ये राहणाऱ्या परदेशीयांपैकी कोणी आपले अपत्य मोलखास अर्पण केले तर त्याला अवश्य जिवे मारावे; आपल्या देशाच्या लोकांनी त्याला दगडमार करावा. लेवीय २०:२

कोणी पंचाक्षरी अथवा चेटूक करणारा असला, मग तो पुरुष असो किंवा स्त्री असो, त्यांना अवश्य जिवे मारावे, त्यांना दगडमार करावा; त्यांच्या रक्तपाताची जबाबदारी त्यांच्याच माथी राहील. लेवीय २०:२७

तू इस्राएल लोकांना सांग की, जो कोणी आपल्या देवाला शिव्याशाप देईल त्याने आपल्या पापाची शिक्षा भोगावी. जो कोणी परमेश्वराच्या नावाची निंदा करील त्याला अवश्य जिवे मारावे; सर्व मंडळीने त्याला अवश्य दगडमार करावा; तो परदेशीय असो किंवा स्वदेशीय असो, त्याने परमेश्वराच्या नावाची निंदा केली तर त्याला जिवे मारावे. लेवीय २४:१५-१६

दगडमाराची ही शिक्षा देवानेच निर्माण केली काय? बायबलमध्ये ही प्रथा कुठून आली हे प्रथम सांगितले आहे काय?

मोशे म्हणाला, “असे करणे उचित नाही, कारण आम्ही जो यज्ञ आमचा देव परमेश्वर ह्याला करणार आहोत त्याची मिसरी लोकांना किळस येईल. मिसरी लोकांच्या दृष्टीने किळसवाणा यज्ञ आम्ही त्यांच्या डोळ्यांदेखत केल्यास ते आम्हांला दगडमार करायचे नाहीत काय? निर्गम ८:२६

दगड मारण्याची प्रथा ही मिसरमध्ये होती. मिसरमधील लोक त्यांच्या देवांविरुद्धच्या अपराधाला अशा प्रकारे हाताळत असत. इस्राएली लोकांना अरण्यात जाऊन बलिदान देण्याची इच्छा का होती याचे एक कारण म्हणजे ते ज्या प्राण्यांचे बलिदान करायचे त्यांची मिसरमधील लोक पूजा करत असत. फारोला हे चांगलेच माहीत असण्याची शक्यता आहे की जर इस्राएली लोक त्या देशात बलिदान देतील तर ते मिसरमधील लोक त्यांना दगड मारण्यास प्रवृत्त होतील.

इस्राएली लोकांनी ही प्रथा स्वीकारली, जी त्यांना मोशेशी काय करायचे होते यावरून स्पष्ट होते.

मोशेने परमेश्वराचा धावा करून म्हटले, “ह्या लोकांना मी काय करू? हे तर मला जवळजवळ दगडमार करायला तयार झाले आहेत.” निर्गम १७:४

जेव्हा कालेब आणि यहोशवा यांनी लोकांना विनंती केली की ते वर जाऊन कनान देश काबीज करू शकतात, तेव्हा लोकांनी त्यांना दगडमार करण्याचा प्रतिसाद दिला.

परमेश्वर आमच्यावर प्रसन्न असला तर तो त्या दुधामधाचे प्रवाह वाहणाऱ्या देशात आम्हांला नेईल आणि तो देश आम्हांला देईल. तुम्ही परमेश्वराविरुद्ध बंड मात्र करू नका; आणि त्या देशाच्या लोकांची भीती बाळगू नका, कारण ते आमचे भक्ष्य होतील; त्यांचा आधार तुटला आहे, पण आमच्याबरोबर परमेश्वर आहे; त्यांची भीती बाळगू नका.” पण सर्व मंडळी म्हणू लागली की, “ह्यांना दगडमार करा.” तेव्हा दर्शनमंडपात परमेश्वराचे तेज सर्व इस्राएल लोकांच्या दृष्टीस पडले. गणना १४:८-१०

जर देवाने हस्तक्षेप केला नसता, तर त्यांनी ते केले असते. मग देवाने इस्रायलच्या कायद्यात दगडमार करण्याच्या या मिसरी प्रथेला परवानगी का दिली असती?

आणखी त्यांची राष्ट्रांमध्ये पांगापांग करीन व त्यांना देशोधडीस लावीन अशी प्रतिज्ञाही मी रानात हात उचलून केली; कारण त्यांनी माझे निर्णय पाळले नाहीत; माझे नियम टाकून दिले, माझे शब्बाथ भ्रष्ट केले, व त्यांचे डोळे त्यांच्या वडिलांच्या मूर्तींकडे लागले. तेव्हा जे चांगले नाहीत असे नियम मी त्यांना दिले, ज्यांनी ते जगायचे नाहीत असे निर्णय त्यांना दिले. मी त्यांची नासधूस केल्याने त्यांना असे समजावे की मी परमेश्वर आहे; मी त्यांना त्यांच्या यज्ञार्पणासंबंधाने असे भ्रष्ट केले की त्यांनी गर्भाशयातून प्रथम निघालेल्यांचा अग्नीत होम केला. यहेज्केल २०:२३-२६

## चांगले नसलेले कायदे आणि निर्णय

इस्राएलाने परमेश्वराचे विधी आणि न्याय नाकारले, त्याचे शब्बाथ अपवित्र केले, म्हणून त्याने त्यांना असे विधी आणि न्याय दिले जे चांगले नव्हते. हे "चांगले नसलेले" विधी आणि न्याय कोणते होते?

परमेश्वराने इस्राएलाच्या मुलांबद्दल असे म्हटले: "कारण त्यांनी माझे न्याय अंमलात आणले नाहीत, त्यांनी माझे विधी तुच्छ मानले, माझे सब्बाथ अपवित्र केले, आणि त्यांची नजर त्यांच्या पूर्वजांच्या मूर्तींकडे लागली होती म्हणून मी त्यांनाही असे विधी दिले जे चांगले नव्हते, आणि असे न्याय जे त्यांच्या जिवासाठी नव्हते." सततच्या अवज्ञेमुळे, परमेश्वराने आपल्या कायद्याच्या उल्लंघनासाठी शिक्षा जोडल्या, ज्या उल्लंघन करणाऱ्यासाठी “चांगल्या” नव्हत्या, आणि ज्यांमुळे त्याला बंडखोर वृत्तीत जीवन मिळणार नव्हते. (1SP 265.2)

हे जे “चांगले नव्हते” असे विधी व न्याय होते, ते म्हणजे त्या शिक्षांचा उल्लेख आहे ज्या कायद्याशी जोडल्या गेल्या आणि पाप केल्यास शिक्षा देण्यासाठी लागू करण्यात आल्या. दगडाने ठार मारणे ही गोष्ट नक्कीच चांगली नाही! या शिक्षा त्यांच्या स्वतःच्या विचारांनुसार, म्हणजेच गुन्ह्याबद्दल न्याय कसा असावा याबाबत त्यांच्या स्वतःच्या समजुतींनुसार ठरवलेल्या होत्या. या शिक्षा त्यांच्या स्वतःच्या विचारांची आणि त्यांच्या स्वतःच्या रितीरिवाजांची प्रतिमा होत्या ज्या त्यांनी मिसर देशात शिकलेल्या होत्या. याबाबत येशू स्पष्ट करतो:

कारण आपण करडे असल्यामुळे मला आपली भीती वाटली; जे आपण ठेवले नाही ते उचलून घेता व जे आपण पेरले नाही त्याची कापणी करता.’ तो त्याला म्हणाला, ‘अरे दुष्ट दासा, मी तुझ्याच तोंडाने तुझा न्याय करतो. मी करडा माणूस आहे, जे मी ठेवले नाही ते उचलून घेतो व जे मी पेरले नाही त्याची कापणी करतो, हे तुला ठाऊक होते काय? लूक १९:२१-२२

लक्षात ठेवा, पाप झाल्यावर शिक्षा म्हणून दगडफेक करण्याची प्रथा ही इस्राएलांनी स्वतःहून स्वीकारलेली होती. जेव्हा त्यांनी निर्गम १७:४ मध्ये मोशेला दगडांनी ठार मारण्याचा निर्णय घेतला, तेव्हा त्यांनी असा एक न्यायभाव दाखवला ज्यामध्ये दयेला काहीही स्थान नव्हते. वचन म्हणते:

याकोब २:१३ कारण ज्याने दया केली नाही त्याचा न्याय दयेवाचून होईल; दया न्यायावर विजय मिळवते.

इस्राएलांनी त्यांच्या न्यायात दया दाखवली नाही, म्हणून त्यांच्या न्यायपद्धतीचेच प्रतिबिंब त्यांच्यावर परत आले. त्यांनी हे मानून घेतलं की देव वाळवंटात त्यांना ठार मारण्याची इच्छा बाळगतो आणि त्यांनी मोशेला दगडांनी मारून टाकण्याची तयारी केली. देवाचा उपहास होऊ शकत नाही, कारण इस्राएलांनी जसं बी पेरलं, तशीच त्यांनी कापणी केली. पुन्हा, येशू सांगतो:

मत्तय ७:१-२ तुमचे दोष काढण्यात येऊ नयेत म्हणून तुम्ही कोणाचे दोष काढू नका. कारण ज्या प्रकारे तुम्ही दोष काढाल त्या प्रकारेच तुमचे दोष काढण्यात येतील आणि ज्या मापाने तुम्ही मापून द्याल त्याच मापाने तुम्हांला मापून देण्यात येईल.

इस्राएलाने स्वतःच्याच तोंडाने, देवाविषयी असलेल्या त्यांच्या स्वतःच्या समजुतींनुसार, वाळवंटात स्वतःच्या मृत्यूसाठी निकाल दिला.

इस्राएली लोकांनी वेळोवेळी ही भीती व्यक्त केली की देव त्यांना वाळवंटात ठार मारणार आहे:

निर्गम १४:११ ते मोशेला म्हणाले, “मिसरात काय कबरा नव्हत्या म्हणून तू आम्हांला येथे रानात मरायला आणले? आम्हांला तू मिसरातून बाहेर आणले ते काय म्हणून?

निर्गम १६:३ इस्राएल लोक त्यांना म्हणू लागले की, “आम्ही मिसर देशात मांसाच्या भांड्याभोवती बसून भरपूर जेवत होतो तेव्हा आम्हांला परमेश्वराच्या हातून मरण आले असते तर पुरवले असते; पण ह्या सर्व समुदायाला उपासाने मारावे म्हणून तुम्ही आम्हांला ह्या रानात आणले आहे.”

गणना १४:२-३ सर्व इस्राएल लोक मोशे आणि अहरोन ह्यांच्याविरुद्ध कुरकुर करू लागले; सर्व मंडळी त्यांना म्हणाली, “आम्ही मिसर देशात मेलो असतो तर बरे झाले असते किंवा ह्याच रानात मेलो असतो तरी बरे झाले असते. तलवारीने आमचा निःपात व्हावा म्हणून परमेश्वर आम्हांला ह्या देशात का नेत आहे? आमच्या बायकामुलांची लूट होईल! आम्ही मिसर देशात परत जावे हेच बरे नव्हे काय?”

त्यांनी जसा न्याय स्वतः ठरवला, तसाच न्याय त्यांना मिळाला:

गणना १४:२६-२९ परमेश्वर मोशे व अहरोन ह्यांना म्हणाला, “ही दुष्ट मंडळी कोठवर माझ्याविरुद्ध कुरकुर करीत राहणार? हे जे इस्राएल लोक माझ्याविरुद्ध कुरकुर करीत आहेत त्यांची कुरकुर माझ्या कानावर आली आहे; म्हणून तू त्यांना सांग, परमेश्वर म्हणतो : ‘माझी शपथ, तुमचे म्हणणे माझ्या कानी आले आहे त्याप्रमाणेच मी तुमचे खरोखर करीन; तुमची प्रेते ह्या रानात पडतील, आणि तुमच्यापैकी ज्यांची गणना झाली त्यांच्या पूर्ण संख्येतील वीस वर्षे व त्यांहून अधिक वयाच्या ज्या लोकांनी माझ्याविरुद्ध कुरकुर केली आहे त्यांपैकी कोणीही

पुढे आपण पाहतो की, जर त्यांनी विश्वास ठेवला असता की देव त्यांच्यावर दया करील, तर ही मृत्युदंडाची शिक्षा त्यांच्यासाठी एक आशीर्वाद ठरली असती. पण त्यांनी तसं मानलं नाही आणि त्यांनी विश्वास ठेवला नाही म्हणून ते नाश पावले.

इब्री ३:१७-१९ आणि ‘चाळीस वर्षे तो कोणावर ‘संतापला’? ज्यांनी पाप केले, ‘ज्यांची प्रेते रानात पडली,’ त्यांच्यावर नव्हे काय? आणि ‘शपथ वाहून’ तो कोणाला म्हणाला की, ‘तुम्ही माझ्या विसाव्यात येणार नाही’? ज्यांनी अवज्ञा केली त्यांनाच की नाही? तरी ह्यावरून आपल्याला दिसून येते की, अविश्वासामुळे त्यांना आत येता आले नाही.

येशूच्या काळात आपण पाहतो की परुशी लोक त्यांच्या स्वतःच्याच न्यायपद्धतीने अडकून गेले होते जी पद्धत त्यांच्यापर्यंत त्यांच्या पूर्वजांनी मिसरमधून उचलून आणली होती. ही गोष्ट स्पष्ट करते की इस्राएली लोक नेहमीच एका भीतीखाली राहत होते, आणि हीच भीती त्यांच्या मनामध्ये एक प्रकारची गुलामगीरी निर्माण करत होती.

लूक २०:४-७ योहानाचा बाप्तिस्मा स्वर्गापासून होता किंवा मनुष्यांपासून होता?" तेव्हा ते आपसांत विचार करून म्हणाले, "स्वर्गापासून असे म्हणावे तर हा म्हणेल की, 'तुम्ही त्याच्यावर विश्वास का ठेवला नाही?' आणि मनुष्यांपासून असे म्हणावे तर सर्व लोक आपल्याला धोंडमार करतील, कारण योहान संदेष्टा होता अशी त्यांची खातरी आहे." तेव्हा त्यांनी उत्तर दिले, "तो कोणापासून होता हे आम्हांला ठाऊक नाही."

परुशी लोक निंदा, क्रोध आणि सूडाच्या जगात राहत होते. कायद्याने त्यांना नियम देणाऱ्याचा नाश करण्याचा प्रयत्न करण्यासाठी एक साधन प्रदान केले. त्यांनी कायद्याचा बेकायदेशीरपणे वापर केला.

ते येशूच्या स्पष्ट फटकारांमुळे त्याच्यावर सूड उगवण्याची तहान बाळगत होते. त्यांनी त्याला अशा प्रकारे काही बोलायला किंवा वागायला प्रवृत्त करण्याचा प्रयत्न केला, की ज्यामुळे त्याला दोषी ठरवता येईल. अनेक वेळा त्यांनी त्याला दगडांनी ठार मारण्याचा प्रयत्न केला, परंतु तो शांतपणे निघून गेला आणि ते त्याला पाहण्यात अपयशी ठरले. (DA 538.1)

इस्राएलाने जे न्यायाचे तत्त्व स्वीकारले होते, तेच देवाने कायद्यात जोडले. देवाने त्यांना त्यांच्या राष्ट्राचे कायदे तयार करण्यात सहभागी होऊ दिले. देवाने त्यांच्या निवडलेल्या तत्त्वांना त्यांच्या दिशेने परावर्ततीत केले कारण देव स्वतः कोणावरही जबरदस्ती करत नाही.

बलप्रयोग करणे हे देवाच्या राज्याच्या तत्त्वांना विरोध करणारे आहे. देवाला हवी असते ती केवळ प्रेमातून होणारी सेवा; आणि प्रेम आज्ञा करून निर्माण होऊ शकत नाही, ते बलपूर्वक मिळवता येत नाही. प्रेम केवळ प्रेमानेच जागृत केले जाऊ शकते. देवाला ओळखणे म्हणजे त्याच्यावर प्रेम करणे होय. (DA 22)

देवाने कधीच त्याच्या आज्ञा इस्राएलावर जबरदस्तीने लादल्या नाहीत. त्याने हे अद्भुत नियम त्यांच्या भल्यासाठी दिले होते. त्याच्या आज्ञा आश्वासने आणि आशेने भरलेल्या होत्या. तरीही, देवाने इस्राएलला त्यांच्या स्वतःच्या देव-कल्पनांनुसार राष्ट्राची रचना करण्याची मुभा दिली. देव स्वतःविषयीचे सत्य त्यांच्यावर लादू शकत नव्हता; ते त्यांना स्वतःहून हवं असायला पाहिजे होते, आणि त्यांनी त्याचा शोध घ्यायला हवा होता. पण त्यांनी तसं केले नाही. त्यांनी देवाला नाकारले, आणि मिसरचे देव जे त्यांना आधीपासूनच माहिती होते त्यांचीच निवड त्यांनी केली.

## सोन्याच्या वासराच्या मुर्तीपुजेचे परिणाम

हे लक्षात घेणे अत्यंत आवश्यक आहे की, दगड मारून ठार करण्याच्या शिक्षेची आज्ञा इस्राएलाने सोन्याच्या वासराभोवती नाच केला त्यानंतर कायद्यात टाकण्यात आल्या. इस्राएलाच्या त्या कृतीतून त्यांनी स्वर्गातील खऱ्या देवाला ठामपणे नाकारले आणि मिसरच्या देवतांपैकी एक असलेल्या सोन्याच्या वासराचे गौरवगान केले. मिसरमध्ये वासराचा किंवा बैलाचा बळी देणाऱ्या एखाद्या इस्राएली इसमाला दगड मारून ठार करण्यात आले असते. पण जेव्हा त्यांनी सोन्याच्या वासराची उपासना स्वीकारली, तेव्हा त्यांनी त्या देवतेच्या शिक्षेच्या पद्धतीलाही स्वीकारले. सोन्याच्या वासराविरुद्ध जाणे म्हणजे दगडाने ठार मारले जाणे हीच शिक्षा त्या उपासनेच्या न्यायव्यवस्थेत होती.

रोमकरांस ६:१६ आज्ञापालनाकरता ज्याला तुम्ही स्वतःस गुलाम असे समर्पण करता, ज्याची आज्ञा तुम्ही मानता त्याचे तुम्ही गुलाम आहात. ज्याचा परिणाम मरण आहे अशा पापाचे गुलाम किंवा ज्याचा परिणाम नीतिमत्त्व आहे अशा आज्ञापालनाचे तुम्ही गुलाम आहात, हे तुम्हांला ठाऊक नाही काय?

इस्राएलाने स्वतःला या खोट्या उपासनेच्या व्यवस्थेला दास म्हणून अर्पण केले होते, जी सैतानाच्या निर्मितीची होती. अनेक लोकांनी सैतानालाच आपला नेता मानले होते, आणि म्हणून त्याच्या तत्त्वांना त्यांच्या राष्ट्रीय शासनव्यवस्थेत जागा मिळाली. अहरोन या पापात सामील झाल्याने सैतानाला अजून अधिक संधी मिळाली. जर मोशेने खास प्रार्थना करून अहरोनासाठी मध्यस्थी केली नसती, तर सैतानाला त्या भावी महायाजकाला नष्ट करण्याची पूर्ण मुभा मिळाली असती, आणि त्यामुळे मोशेला आणि इस्राएलला फार मोठा शोक सहन करावा लागला असता.

निर्गम ३२:३४-३५: आता तू जा, ज्या स्थलाविषयी मी तुला सांगितले आहे तिकडे त्यांना घेऊन जा. माझा दूत तुझ्यापुढे चालेल; तरी ज्या दिवशी मी झडती घेईन त्या दिवशी त्यांच्या पापाबद्दल त्यांचा समाचार घेईन." अहरोनाने बनवलेले वासरू लोकांनीच बनवले होते, म्हणून परमेश्वराने त्यांना ताडन केले.

या वचनात एक लक्षवेधी गोष्ट म्हणजे हे स्पष्टपणे म्हटले आहे की, परमेश्वराने लोकांवर पीडा आणली कारण त्यांनी वासरु बनवले. इथे वापरलेला "ताडन" हा शब्द तोच आहे जो खालील वचनात वापरला आहे:

निर्गम २१:३५: एखाद्याच्या बैलाने दुसऱ्याच्या बैलाला दुखापत करून मारून टाकले, तर जिवंत राहिलेला बैल विकून त्याचा पैसा दोन मालकांनी सारखा वाटून घ्यावा; मेलेला बैलही त्यांनी वाटून घ्यावा.

या शब्दाचा संदर्भ एका बैलाने दुसऱ्या बैलाला दुखापत करणे आणि तो मरणे असा वापरला जाऊ शकतो. इस्राएलाने मिसराच्या देवतांची पूजा करण्याचा निर्णय घेतला आणि देवाने त्यांच्यावर बैल किंवा वासराच्या देवतेचा हल्ला चढवला. देवाने इस्राएलाला त्यांच्या देवतेबद्दलच्या समजुतींनुसार भेट दिली. सोन्याच्या वासराची पूजा ही सैतानाची निर्मिती असल्याने, त्याच्या तत्त्वांना त्यांच्या जीवनावर अधिक नियंत्रण ठेवण्याची परवानगी देण्यात आली.

## अग्नीतून

यहेज्केलमध्ये उल्लेख केलेल्या मिसरी लोकांच्या उपासनेशी संबंधित आणखी एक प्रथा आपल्याला दिसते:

यहेज्केल २०:२५-२६ तेव्हा जे चांगले नाहीत असे नियम मी त्यांना दिले, ज्यांनी ते जगायचे नाहीत असे निर्णय त्यांना दिले. मी त्यांची नासधूस केल्याने त्यांना असे समजावे की मी परमेश्वर आहे; मी त्यांना त्यांच्या यज्ञार्पणासंबंधाने असे भ्रष्ट केले की त्यांनी गर्भाशयातून प्रथम निघालेल्यांचा अग्नीत होम केला.

मिसरी लोक त्यांच्या मुलांना अग्नीच्या भिंतीतून उडी मारायला लावतील. ह्या भविष्यवाणीच्या आत्म्याच्या लेखांकडे लक्ष द्या:

मिसरच्या लोकांनी बलिदानासंबंधी काही परंपरा प्राप्त केल्या होत्या. त्यांनी स्वर्गातील खऱ्या देवाच्या अस्तित्वाला मान्यताच दिली नव्हती. त्याऐवजी ते त्यांच्या मूर्तीच्या देवतांना बलिदान अर्पण करत. मोठ्या थाटामाटात आणि विधींसह ते मूर्तिपूजा करत. त्यांनी आपल्या देवतांच्या सन्मानार्थ वेदि उभारल्या आणि अगदी आपल्या स्वतःच्या मुलांनाही अग्नीमधून जावे लागेल अशा चाचणीला सामोरे जावे अशी सक्ती केली. वेदिका उभारल्यानंतर, त्यांनी आपल्या मुलांना त्या वेदिवरून, अग्नीच्या ज्वालांमधून उडी मारायला लावले. जर ते मूल भाजल्याशिवाय हे करू शकले, तर मूर्तीचे याजक आणि लोक याला अशा प्रकारे घेत की त्यांच्या देवतेने त्यांनी अर्पण केलेले बलिदान स्वीकारले आणि विशेषतः ज्या व्यक्तीने हे अग्नीप्रयोग पार केले, त्याच्यावर कृपा केली. अशा व्यक्तीला अनेक लाभ देण्यात येत, आणि त्या व्यक्तीला नंतर समाजात फार मोठा मान मिळत असे. त्याने कितीही मोठे गुन्हे केले, तरी त्याला कधीच शिक्षा दिली जात नसे. पण जर एखादी व्यक्ती, अग्नीमधून उडी मारताना भाजली गेली, तर

त्याचे भविष्य निश्चित ठरत असे कारण लोक असं समजत की त्यांच्या देवता रुष्ट झाल्या आहेत आणि त्या केवळ त्या दुर्दैवी बळीच्या प्राणांनीच शांत होतील. मग त्या व्यक्तीला त्यांच्या मूर्तींच्या वेदिकेवर बलिदान म्हणून अर्पण केले जाई.

इस्राएलामधील काही मुलांनीही स्वतःला इतके अधःपातित करून टाकले होते की त्यांनी या अत्यंत घृणास्पद चालीरीती अंगीकारल्या. आणि देवाने त्यांच्या मुलांवर आग प्रज्वलित केली, ज्यांना त्यांनी अग्नीमधून जाऊ दिले होते. त्यांनी जरी मूर्तिपूजक राष्ट्रांप्रमाणे सर्व गोष्टी केल्या नसल्या, तरी देवाने त्यांच्या मुलांना अग्नीमधून जात असताना जळून जाण्याची परवानगी दिली आणि अशा प्रकारे त्यांच्यापासून त्यांची संतती हिरावून घेतली. (1SP 268.1)

म्हणून दगडफेक ही केवळ मिसरी पूजा पद्धतीशीच जोडली गेली नाही तर अग्नीतून जाळून टाकली गेली. आपण पाहतो की देवाने त्याच्या दयेने इस्राएली लोकांच्या मुलांना आणि मुलींना अग्नीत जाळून टाकण्याची परवानगी दिली. दयेने परमेश्वराने या मुलांना अग्नीतून जाण्याऐवजी आणि भयंकररित्या भाजून घेण्याऐवजी आणि नंतर मिसरी देवतांना मृत्युदंड देण्याच्या भीतीला तोंड देण्याऐवजी त्वरित मरण येऊ दिले. म्हणून दगडफेकची प्रथा मुलांना अग्नीतून जाळून टाकण्याशी जोडली गेली आहे हे पाहणे मनोरंजक आहे.

लेवीय २०:२ "इस्राएल लोकांना आणखी असे सांग की, इस्राएल लोकांपैकी अथवा इस्राएल लोकांमध्ये राहणाऱ्या परदेशीयांपैकी कोणी आपले अपत्य मोलखास अर्पण केले तर त्याला अवश्य जिवे मारावे; आपल्या देशाच्या लोकांनी त्याला दगडमार करावा.

## पापाला पापाने शिक्षा करणे

हे लक्षात घेण्यासारखं एक महत्त्वाचं वास्तव आहे की, या दोन्ही प्रथांचा संगम मिसरच्या संस्कृतीतून आलेला होता. एक प्रथा दुसऱ्याचा नाश करण्यासाठी वापरली जात होती. देव या उपासना-पद्धतीच्या एका पैलूवरील दुष्कृत्यांचा निकाल त्याच उपासना-पद्धतीच्या दुसऱ्या पैलूतून काढतो. तो पापावर पापानेच शिक्षा करतो. ही गोष्ट इस्राएली लोकांना समजली असती काय? या अशा न्यायदंडांमध्ये जे "चांगले नाहीत," त्या माध्यमातून परमेश्वर इस्राएलाला पापाचं आत्मविनाशक स्वरूप दाखवत होता काय? आणि त्याच वेळी, त्यांनीच निवडलेल्या शिक्षांना स्वीकारू देत होता काय, अशा शिक्षांना, ज्या त्यांनी उपासना करत असलेल्या देवतांमध्ये पाहिलेल्या दयेच्या स्वरूपाशी सुसंगत होत्या? अशा प्रकारच्या न्यायदंडांचा मिसरवर झालेल्या शिक्षांशी काही साम्य आहे काय? देवाने मिसरवर संकटं पाठवली, जी संकटं त्यांच्या देवतांच्या

स्वरूपातच प्रकट झाली होती. त्यामुळे देवाने मूर्तिपूजेच्या पापावर शिक्षा केली त्या वस्तूंतून ज्या त्या मूर्तींचे प्रतिनिधित्व करत होत्या.

इस्राएलने जेव्हा सोन्याच्या वासऱ्याची उपासना-व्यवस्था स्वीकारली, तेव्हा त्यांनी अग्नीमधून जाण्याच्या, जळण्याच्या शिक्षेचे निमंत्रण दिले नव्हते काय?

गणना *11:1* मग लोक संकटात सापडल्यासारखे कुरकुर करू लागले*;* ते परमेश्वराच्या कानी पडले. ते ऐकून परमेश्वराचा कोप भडकला आणि त्याच्या अग्नीने त्यांच्यामध्ये पेट घेऊन छावणीच्या हद्दीवरचे काही भाग भस्म केले.

## मिश्र लोकसंख्या

भविष्यवाणीच्या आत्म्याने हे नमूद केले आहे की ज्यांनी आपल्या मुलांना मूर्ती व देवतांच्या उपासनेसाठी अग्नीतून जाण्यास भाग पाडले, त्यांच्या त्या मुलांना देवाने भस्मसात केले. गणना ११ मध्ये आपण हेच घडताना पाहतो. लोक अग्नीने भस्मसात होत होते. ही एक अशी प्रक्रिया होती जी त्यांना ठाऊक होती. हे पुन्हा स्पष्टपणे सांगणे आवश्यक आहे की इस्राएलाने मिसरच्या उपासना-प्रणालीची निवड केली होती. गणना ११:१ मध्ये छावणीच्या सीमेलगत असणाऱ्या लोकांचा विशेष उल्लेख आहे. एलेन व्हाईट स्पष्ट करतात की हे लोक म्हणजेच "मिश्र जमाव" होते, जे इस्राएलाच्या मागे किंवा कडेने चालत होते.

"आणि एक मिश्र जमाव देखील त्यांच्याबरोबर वर आला..." या जमावात फक्त असे लोक नव्हते जे इस्राएलाच्या देवावर विश्वास ठेवून आले होते, तर त्यात बरेचसे असे होते जे केवळ मिसरमधील संकटांपासून सुटका मिळवण्यासाठी आले होते किंवा गर्दीच्या ओघामागे फक्त उत्सुकता आणि उत्तेजनाने सामील झाले होते. (PP 281)

सोन्याच्या वासऱ्याशी संबंधित अपवित्र बंडाची सुरूवात या मिश्र जमावाकडूनच झाली.

"मिश्र जमावच सर्वप्रथम कुरकुर आणि अधीरतेत पडले आणि नंतरच्या बंडखोरीत त्यांनीच पुढाकार घेतला." "मिसरमध्ये ज्या वस्तूंना देवतेचे प्रतीक मानले जात होते, त्यात बैल किंवा वासरही होते; आणि मिसरमध्ये अशा प्रकारची मूर्तिपूजा केलेल्या लोकांच्या सूचनेवरूनच वासऱ्याचे मूर्तिरूप तयार करण्यात आले आणि त्याची उपासना करण्यात आली." (PP 316)

हा गट इस्राएलाच्या छावणीच्या कडेला राहत होता. ते स्वर्गातील खऱ्या देवावर निष्ठावान नव्हते, त्यांना केवळ मिसरच्या संकटांपासून बचाव हवा होता. सैतान अनेक वेळा या गटाचा उपयोग इस्राएलला पापाच्या मार्गावर नेण्यासाठी करत असे.

मोशे त्यांच्या समोर ख्रिस्ताचा प्रतिनिधी म्हणून उभा होता. तरीही त्यांनी त्याला दगड मारून ठार करायचा प्रयत्न केला. त्याचप्रमाणे, यहुदी लोकांनी ख्रिस्ताला ठार करण्यासाठी रोमच्या वधस्तंभाच्या पद्धतीचा अवलंब केला. त्यांनी ख्रिस्ताला नाकारले आणि बाराब्बाला निवडले, आणि चाळीस वर्षांनी त्याच निवडीचे परिणाम त्यांनी भोगले जेव्हा यरुशलेम नष्ट झाला आणि संपूर्ण राष्ट्र सैतानाच्या नियंत्रणाखाली गेले.

"देवाच्या प्रेम आणि करुणेला हट्टाने नकार दिल्यामुळे यहुद्यांनी स्वतःहून देवाच्या संरक्षणापासून स्वतःला वंचित केले, आणि सैतानाला त्यांच्यावर त्याच्या इच्छेनुसार राज्य करण्याची संधी मिळाली." "यरुशलेमच्या विनाशात घडलेल्या भयंकर क्रूरता सैतानाच्या सूडभावनेच्या सामर्थ्याचे प्रात्यक्षिक होते विशेषतः त्यांच्या बाबतीत, ज्यांनी स्वतःला त्याच्या अधीनतेखाली दिले." (GC 35, 36)

## नादाब आणि अबीहू

आपण अग्नीद्वारे झालेला न्याय पुन्हा एकदा नादाब आणि अबीहू यांच्या संदर्भात पाहतो:

लेवीय १०:१-२ अहरोनाचे मुलगे नादाब व अबीहू ह्यांनी आपापली धुपाटणी घेऊन त्यांत अग्नी घातला व त्यांवर धूप घालून तो अनधिकृत अग्नी परमेश्वरासमोर नेला. असा अग्नी नेण्याची परमेश्वराची आज्ञा नव्हती. तेव्हा परमेश्वरासमोरून अग्नी निघाला व त्याने त्यांना भस्म केले; आणि ते परमेश्वरासमोर मरण पावले.

हा न्यायाचा तोच प्रकार होता, जो इस्राएलाने स्वतःच निवडला होता जेव्हा त्यांनी सोन्याच्या वासऱ्याची उपासना केली आणि मिसरच्या शिक्षांच्या पद्धती स्वीकारल्या. येशूने आपल्याला स्पष्ट सांगितले आहे:

मत्तय ७:२ कारण ज्या प्रकारे तुम्ही दोष काढाल त्या प्रकारेच तुमचे दोष काढण्यात येतील आणि ज्या मापाने तुम्ही मापून द्याल त्याच मापाने तुम्हांला मापून देण्यात येईल.

इस्राएलाने ही प्रणाली स्वतःहून स्वीकारली होती, म्हणून त्यांचा न्यायही त्यांच्या स्वतःच्या इच्छांनुसार आणि त्यांनी निवडलेल्या तत्त्वांनुसारच झाला. ही अग्नी प्रत्यक्षात "परमेश्वराकडून" कशी बाहेर आली, हे आपण निश्चितपणे सांगू शकत नाही. पण भविष्यवाणीच्या आत्म्याने याविषयी जे काही सांगितले आहे, ते पुढीलप्रमाणे:

"नादाब आणि अबीहू हे मंदिराचे याजक होते, आणि जरी सामान्य अग्नीचा वापर करणे

योग्य नव्हते, तरी या याजकांनी, जेव्हा ते देवापुढे गेले, तेव्हा त्यांनी पवित्र न ठरवलेल्या अग्नीने धूप पेटवण्याचे धाडस केले. याजक मद्यपान करत होते, आणि त्यामुळे त्यांची नैतिक जाणीव कुंठित झाली होती; त्यांना त्यांच्या कृत्याचे स्वरूप समजले नाही किंवा त्यांच्या पापाचे भयानक परिणाम काय होतील याचे भान राहिले नव्हते. एक आग अत्यंत पवित्र स्थानातून बाहेर आली आणि तिने त्यांना भस्मसात केले." (Temperance, पृष्ठ 280)

## स्वर्गातून आलेली वीज

ही आग थेट परमपवित्र स्थानातून बाहेर पडली. प्रकटीकरण आपल्याला परमपवित्र स्थानातून येणाऱ्या इतर गोष्टींबद्दल सांगते:

तेव्हा देवाचे स्वर्गातील मंदिर उघडण्यात आले, 'त्याच्या मंदिरात त्याच्या कराराचा कोश' दृष्टीस पडला आणि 'विजा' चमकल्या, 'गर्जना' व मेघांचे गडगडाट झाले, भूमिकंप झाला व 'मोठ्या गारांची वृष्टीही' झाली. प्रकटी ११:१९

दानीएल १० मध्ये दर्शविलेला ख्रिस्त, विजेसारखे तोंड असलेले आणि ख्रिस्ताला कबरेतून बोलावण्यासाठी आलेल्या देवदूतासारखे आहे असे वर्णन केले आहे:

दानीएल १०:५-६ मी डोळे वर करून पाहिले तर तागाची वस्त्रे परिधान केलेला आणि कंबरेस उफाज देशाच्या शुद्ध सोन्याचा पट्टा घातलेला असा एक पुरुष माझ्या दृष्टीस पडला. त्याचे शरीर वैडूर्यमण्यासारखे असून त्याचे मुख विद्युल्लतेसारखे होते. त्याचे नेत्र पेटलेल्या दीपांसमान होते, त्याचे हातपाय उज्ज्वल पितळेसारखे होते आणि त्याच्या शब्दाचा ध्वनी एखाद्या समुदायाच्या गजबजाटासारखा होता.

मत्तय २८:२-३ तेव्हा पाहा, मोठा भूमिकंप झाला; कारण प्रभूचा दूत स्वर्गातून उतरला, त्याने येऊन धोंड एकीकडे लोटली आणि तिच्यावर तो बसला. त्याचे रूप विजेसारखे होते व त्याचे वस्त्र बर्फासारखे शुभ्र होते.

हे देखील महत्त्वाचे आहे की सैतानाला स्वर्गातून पडणारी वीज असे संबोधले जाते.

लूक १०:१८ तेव्हा त्याने त्यांना म्हटले, "सैतान आकाशातून विजेसारखा पडला हे मी पाहिले.

असे दिसते की वीज चमकणे, मेघगर्जना आणि भूकंप हे ख्रिस्ताच्या आणि देवदूतांच्या चांगल्या किंवा वाईट शक्तीशी जोडलेले आहेत. सर्व शक्ती देवाची असल्याने, देवदूतांच्या कार्याला दिलेली सर्व शक्ती देव पित्याने निश्चित केली पाहिजे.

स्तोत्रसंहिता ६२:११ एकदा देव बोलला आहे; मी दोनदा हे ऐकले आहे की, सामर्थ्य देवाचे आहे.

रोमकरांस १३:१ प्रत्येक जणाने वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या अधीन असावे; कारण देवापासून नाही असा अधिकार नाही; जे अधिकारी आहेत ते देवाने नेमलेले आहेत.

एलीयाच्या कथेत देवदूतांच्या उपस्थिती आणि सामर्थ्याबद्दल बोलणारे हिंसक वारा किंवा वादळ, भूकंप आणि आग यांचे संदर्भ दिले आहेत हे उल्लेखनीय आहे:

१ राजे १९:११-१२ त्याने त्याला म्हटले, “तू येथून बाहेर निघून जा; पर्वतावर परमेश्वरासमोर उभा राहा.” तेव्हा पाहा, परमेश्वर जवळून जात असताना त्याच्यासमोरून मोठा सुसाट्याचा वारा सुटून डोंगर विदारत व खडक फोडत होता; पण त्या वाऱ्यात परमेश्वर नव्हता. वारा सुटल्यानंतर भूमिकंप झाला; पण त्या भूमिकंपातही परमेश्वर नव्हता. भूमिकंपानंतर अग्नी प्रकट झाला; पण त्या अग्नीतही परमेश्वर नव्हता; त्या अग्नीनंतर शांत, मंद वाणी झाली.

देवाची शक्ती चांगल्या आणि वाईट दोन्ही देवदूतांना दिली जाते, म्हणून एलीयाच्या अनुभवामुळे आपल्याला शक्तीच्या प्रदर्शनाद्वारे देवाचे चरित्र निश्चित करण्याविरुद्ध इशारा मिळतो काय? त्याच्या शक्तीचे काही उपयोग थेट त्याच्याकडून येतात, तर काही उपयोग केवळ सैतानाद्वारे स्वर्गातून पडणाऱ्या वीजेतून होतात. अनेक परिस्थिती निश्चित करणे खूप कठीण असल्याने, त्याची दया, प्रेम आणि कृपेबद्दल सांगण्यासाठी आपण त्याच्या मंद आवाजाचे ऐकूया.

ईयोबाच्या कथेत आणि स्वर्गातून पडलेल्या देवाच्या अग्नीच्या कथेत सैतानाला देवाच्या शक्तीचा वापर करण्याची परवानगी मिळाल्याचे स्पष्ट उदाहरण आपल्याला मिळते.

ईयोब १:८-१६,१९ परमेश्वराने सैतानाला विचारले, “माझा सेवक ईयोब ह्याच्याकडे तुझे लक्ष गेले होते काय? भूतलावर त्याच्या तोडीचा सात्त्विक, सरळ, देवाला भिऊन वागणारा व पापापासून दूर राहणारा असा दुसरा कोणी नाही.” सैतानाने परमेश्वराला उत्तर दिले की, “ईयोब देवाचे भय काय फुकट बाळगतो? तो, त्याचे घर व त्याचे सर्वस्व ह्याभोवती तू कुंपण घातले आहेस ना? तू त्याच्या हाताला यश दिले आहेस ना? व देशात त्याचे धन वृद्धी पावत आहे ना? तू आपला हात पुढे करून त्याच्या सर्वस्वास लावून तर पाहा, म्हणजे तो तुझ्या तोंडावर तुझा अव्हेर करील.” परमेश्वर सैतानाला म्हणाला, “पाहा, त्याचे सर्वस्व तुझ्या हाती देतो; त्याला मात्र हात लावू नकोस.” मग सैतान परमेश्वरासमोरून निघून गेला. एके दिवशी असे झाले की, ईयोबाचे पुत्र व कन्या आपल्या ज्येष्ठ बंधूच्या घरी भोजन करीत व द्राक्षारस पीत असता, एका जासुदाने ईयोबाकडे येऊन सांगितले, “बैल नांगरीत होते व त्यांच्याजवळ गाढवी चरत होत्या.

तेव्हा शबाई लोक घाला घालून त्यांना घेऊन गेले; त्यांनी तलवारीच्या धारेने गड्यांना वधले; हे तुला सांगायला मी एकटाच निभावून आलो आहे.” तो हे सांगत आहे इतक्यात दुसऱ्या एकाने येऊन सांगितले, “दैवी अग्नीचा आकाशातून वर्षाव झाला; त्याने मेंढरे व गडी जाळून भस्म केले; हे तुला सांगायला मी एकटा निभावून आलो आहे.” तेव्हा रानातून आलेल्या प्रचंड वाऱ्याच्या सोसाट्याने त्या घराचे चाऱ्ही कोपरे हादरले; त्यामुळे ते घर त्या तरुण मंडळीवर कोसळले आणि ती सगळी मरून गेली; हे तुला सांगायला मी एकटा निभावून आलो आहे.”

## संरक्षण काढून टाकणे

सर्व सामर्थ्य परमेश्वराकडूनच येते, आणि आपण पाहतो की अग्नी, वारा आणि तलवारीद्वारे विनाश करण्यासाठी हेच सामर्थ्य सैतानालाही वापरायला परवानगी दिले जाते. हे सामर्थ्य खरंतर परमेश्वराकडून येते, पण जिथे परमेश्वराचा रक्षण करणारा हात कार्यरत नसतो, तिथे ते सामर्थ्य सैतानाच्या वापरासाठी खुले केले जाते. सोन्याच्या वासऱ्याच्या घटनेनंतर इस्राएलाच्या संरक्षणावर परिणाम झाला, याची एक फार महत्त्वाची गोष्ट आपल्याला दिसते.

त्या प्रसंगानंतर मोशेने अहरोनाला झापले आणि त्याला सांगितले की त्याचे वर्तन अत्यंत निंदनीय होते. कारण तो लोकांपेक्षा विशेष सन्मानित होता, आणि त्याला स्वतः परमेश्वराशी निकट संवाद साधण्याचे सौभाग्य लाभलेले होते. अशा स्थितीत त्याने आपल्या जीवाचे रक्षण करावे म्हणून इतकं गंभीर पाप केले, हे विश्वासू मोशेसाठी अचंब्याचे कारण ठरले. मोशेने पाहिले की लोक नग्न होते याचा अर्थ, त्यांचे दागिने उतरवले गेले होते. कारण अहरोनाने त्यांना नग्न केलं होते आणि त्यांच्या शत्रूंसमोर त्यांना लाजिरवाण्या अवस्थेत आणले होते. केवळ त्यांचे दागिने हरवले गेले नव्हते, तर त्यांनी सैतानाविरोधातले आपले आत्मिक संरक्षणही गमावले होते. त्यांनी आपली भक्ती आणि परमेश्वरासाठीची समर्पित अवस्था गमावली होती, आणि त्यामुळे परमेश्वराचे रक्षणही त्यांच्यापासून काढून घेण्यात आले होते. परमेश्वराने, आपला आधार देणारा हात मागे घेतला आणि त्यामुळे ते शत्रूंच्या तिरस्कार आणि सामर्थ्याच्या ताब्यात गेले. त्यांच्या शत्रूला मिसरमध्ये मोशेच्या हातून घडलेल्या अद्भुत कार्यांबद्दल चांगलीच माहिती होती. त्यांना माहीत होते की इब्र्यांच्या देवाच्या आज्ञेने मोशे त्यांना मिसरमधून बाहेर घेऊन गेला होता मूर्तिपूजेतून त्यांची मुक्तता करण्यासाठी आणि त्यांचे संपूर्ण प्रेम व पवित्र उपासना परमेश्वरासाठी राखून ठेवण्यासाठी. १ SP २५०

ईयोबाची कथा इस्राएलाच्या लोकांसाठी विशेष अर्थपूर्ण होती. कारण या दोन्ही घटनांमध्ये ईयोब आणि इस्राएल ह्यांच्यावरून परमेश्वराचे रक्षण हटवले गेले आणि सैतानाला त्यांच्यावर हल्ला करण्याची व त्रास देण्याची संधी मिळाली. जेव्हा मोशे मिसरमध्ये जाण्याआधी ईयोबाचे पुस्तक लिहीत होता तेव्हा परमेश्वराने जंगलातील त्यांच्या अनुभवासाठी आधीच तयारी करून ठेवली होती.

वाळवंटातील एकांतात घालवलेली दीर्घ वर्षे वाया गेली नाहीत. मोशेला त्याच्यासमोर असलेल्या महान कार्याची तयारी तर होत होतीच, पण याच काळात, पवित्र आत्म्याच्या प्रेरणेने, त्याने उत्पत्तीचे पुस्तक आणि ईयोबाचे पुस्तक देखील लिहिले, जे काळाच्या शेवटपर्यंत देवाच्या लोकांकडून सर्वात जास्त आवडीने वाचले जाईल. ST, १९ फेब्रुवारी, १८८०

## देवदूतांचे विनाशकारी कार्य

चांगले आणि वाईट दोन्ही देवदूतांना परमेश्वराच्या सामर्थ्याच्या वापराची परवानगी आहे, आणि ते सिंहासनापासून निघणाऱ्या विजेसारखे असतात, हे लक्षात घेता, आपण हे कसं ओळखावे की त्या सामर्थ्याचा वापर कोण करत आहे, चांगले की वाईट देवदूत? महान संघर्ष या पुस्तकात याचे स्पष्टीकरण आहे की, विनाशकारी सामर्थ्याचा वापर दोन्ही प्रकारचे देवदूत करतात:

"जेव्हा तो [ख्रिस्त] पवित्रस्थान सोडतो, तेव्हा पृथ्वीवरील रहिवाशांवर अंधार पसरतो. त्या भयानक काळात, धर्मी लोकांना एक मध्यस्थ नसतानाही पवित्र परमेश्वराच्या उपस्थितीत जगावे लागेल. जे नियंत्रण दुष्टांवर ठेवलेले होते, ते हटवले जाते, आणि शेवटी पश्चात्ताप न करणाऱ्यांवर सैतानाला पूर्ण अधिकार मिळतो. परमेश्वराची सहनशीलता संपते. जगाने त्याच्या करुणेला नाकारले आहे, त्याच्या प्रेमाचा तिरस्कार केला आहे, आणि त्याच्या कायद्याला पायदळी तुडवले आहे. दुष्ट लोक त्यांच्या परीक्षेच्या मर्यादेपलीकडे गेले आहेत; त्यांनी सातत्याने पवित्र आत्म्याचा विरोध केला, आणि अखेरीस तो मागे घेतला गेला आहे. आता दैवी कृपेने संरक्षण नसल्यामुळे, त्यांच्याकडे दुष्ट एकाकडून कोणतेही संरक्षण उरलेले नाही. तेव्हा सैतान संपूर्ण पृथ्वीवरच्या लोकांना एका महान आणि अंतिम संकटात लोटेल. जेव्हा परमेश्वराचे देवदूत मानवी वासनांच्या वाऱ्यांना थोपवणे थांबवतात, तेव्हा संघर्षाचे सर्व घटक मोकळे होतील. संपूर्ण जग एका अशा विध्वंसक स्थितीत सापडेल जे जुन्या यरुशलेमच्या विनाशापेक्षा भयंकर असेल.

एका देवदूताने मिसरमध्ये सर्व जेष्ठ मुलांना मारले आणि संपूर्ण देश शोकात बुडवला. जेव्हा दावीदाने परमेश्वराविरुद्ध पाप करून लोकांची गणना केली, तेव्हा एका देवदूताने त्याच्या पापाची शिक्षा करत भीषण विनाश घडवून आणला. जे विनाशकारी सामर्थ्य पवित्र देवदूत परमेश्वराच्या आज्ञेने वापरतात, तेच सामर्थ्य वाईट देवदूत परमेश्वराची परवानगी मिळाल्यावर वापरतात. अशा शक्ती सध्या तयार आहेत आणि फक्त दैवी परवानगीची वाट पाहत आहेत, जेणेकरून त्या सर्वत्र विनाश पसरवतील." (महान संघर्ष 614.2)

आपण देवदूतांचा विनाशकारी सामर्थ्य वापरण्याचा एक स्पष्ट पुरावा यरुशलेमच्या नाशाच्या संदर्भातही पाहतो:

"लोक लाखो रुपये खर्च करून महागड्या इमारती उभारतील; त्यांचे वास्तुशास्त्रीय सौंदर्य आणि मजबुती विशेषतः लोकांचे लक्ष वेधून घेईल; पण परमेश्वराने मला शिकवले आहे की, जरी त्या इमारती अतिशय मजबूत आणि वैभवशाली असल्या, तरी त्यांचेही यरुशलेममधील मंदिरासारखेच हाल होतील. ते भव्य मंदिर पडून गेले. देवाचे देवदूत ते नष्ट करण्यासाठी पाठवले गेले, आणि असा एकही दगड नव्हता जो उलथवून टाकला गेला नव्हता." (MS 35, 1906; 5BC 1098)

आपल्याला माहिती आहे की प्रत्यक्षात रोमन सैनिकांनी मंदिर नष्ट केले, पण इथे आपण पाहतो की देवाचे देवदूत या कार्यात त्यांना मदत करत होते. पुन्हा एकदा आपण देवदूत आणि मनुष्य यांच्या एकत्रित कृतीचा नमुना यरीहोच्या विनाशात पाहतो जेथे देवदूत आणि मानवी सहयोगातून परमेश्वराच्या न्यायकार्यात सहभागी होता येते.

ख्रिस्त म्हणजे ती शिडी आहे जी याकोबाने पाहिली होती ज्यावरून देवाचे दूत वरून खाली आणि खालून वर जात होते, आणि ज्याच्या प्रत्येक पायरीवर देवाचे तेज स्वर्गाच्या सर्वोच्च ठिकाणापासून पृथ्वीपर्यंत झळकत होते. ख्रिस्तानेच देव आणि मनुष्य यांच्यामधील दरी, तसेच स्वर्ग आणि पृथ्वी यांच्यातील अंतर ओलांडले, आणि तो आपल्या वतीने सतत कार्यरत आहे. आपण प्रत्येकाने त्याच्याशी आणि स्वर्गीय देवदूतांशी सहकार्य करणे आवश्यक आहे. पण ख्रिस्त आपल्या सहकार्याविना आपल्यासाठी काहीच करू शकत नाही, आणि आपणही त्याच्याविना काहीच करू शकत नाही. सैतान आणि त्याचे दूत आपल्याशी युद्ध करीत आहेत आणि हे युद्ध जगाच्या शेवटापर्यंत सुरूच राहील. येशूने स्पष्टपणे सांगितले आहे, "माझ्याविना तुम्ही काहीच करू शकत नाही." हाच तो धडा आहे जो ख्रिस्ताने सर्व काळांमध्ये आणि प्रत्येक पिढीत आपल्या संतांना शिकवला आहे. जेव्हा यहोशवा सकाळी यरीहो घेण्यापूर्वी बाहेर गेला, तेव्हा त्याच्या समोर युद्धासाठी पूर्ण सज्ज असा एक योद्धा उभा राहिला. योशवाने विचारले, "तू आमच्याकडचा आहेस की आमच्या शत्रूंकडचा?" त्यावर तो म्हणाला, "मी आता प्रभुच्या सैन्याचा सेनापती म्हणून आलो आहे." जर योशवाचे डोळे

एलिशाचा सेवक डोथानमध्ये जसे उघडले गेले होते तसे उघडले गेले असते, आणि त्याला तो दृश्य पाहण्याची सहनशक्ती असती, तर त्याने इस्राएलाच्या लोकांच्या सभोवती तळ ठोकून असलेले प्रभुचे देवदूत पाहिले असते; कारण स्वर्गातील प्रशिक्षित सैन्य इस्राएलाच्या लोकांसाठी लढण्यासाठी आले होते, आणि प्रभुच्या सैन्याचा सेनापती त्यांना आदेश देण्यासाठी तेथे हजर होता. जेव्हा यरीहोचा उध्वस्त बुरुज कोसळला, तेव्हा त्या शहराच्या भिंतींना कोणत्याही मानवी हाताने स्पर्शसुद्धा केला नव्हता तर प्रभुच्या देवदूतांनीच त्या बुरुजांचे रक्षण मोडून काढले आणि शत्रूंच्या किल्ल्यात प्रवेश केला. ते इस्राएल नव्हते, तर प्रभुच्या सैन्याचा सेनापती होता ज्याने यरीहो घेतले. मात्र, इस्राएलाने आपला विश्वास त्या तारणाच्या सेनापतीवर दाखवण्यासाठी आपला भाग बजावला. (Review and Herald, 19 जुलै 1892)

प्रभुचे देवदूत आपले सहकार्य अपेक्षित करतात, कारण जर देवावर आपला विश्वास नसेल, तर देव आपल्यासाठी आपल्या देवदूतांना आदेश देऊ शकत नाही. आपण योनाथानच्या जीवनात हे पाहतो, जेव्हा तो पलिष्टयांविरुद्ध लढायला गेला तेव्हा स्वर्गातील देवदूतांनी त्याला मदत केली.

देवदूतांनी योनाथान आणि त्याच्या शिपायाचे संरक्षण केले, त्यांच्या सोबत युद्ध केले, आणि पलिष्टी लोक त्यांच्यासमोर पडले. पृथ्वी थरथरली, जणू काही मोठा सैन्यदल घोडेस्वार आणि रथांसह येत आहे, अशी अनुभूती झाली. योनाथानने देवाच्या सहाय्याची चिन्हे ओळखली, आणि अगदी पलिष्टयांनीही जाणले की देव इस्राएलाच्या तारणासाठी कार्यरत आहे. (Patriarchs and Prophets, पृ. 625)

योनाथानने देवाच्या सहाय्याची चिन्हे ओळखली होती. हेच सहाय्य दावीदालाही मिळाले, कारण त्याने देवावर विश्वास ठेवला.

२ शमुवेल ५:२४ तुतीच्या झाडांच्या शेंड्यांमधून सेना कूच करीत आहे असा आवाज तुझ्या कानी पडताच उठावणी कर, कारण परमेश्वर पलिष्ट्यांच्या सेनेचा संहार करण्यासाठी तुझ्या पुढे गेला आहे असे समज."

आपण देवाचे देवदूत योनाथान आणि शस्त्रवाहकाला त्यांच्या शत्रूंचा पराभव करण्यात मदत करताना पाहतो. आपल्याला असे सांगितले जाते की देवदूतांनी त्या दोघांचे रक्षण केले. ते त्यांच्या बाजूने लढले असेही म्हणतात. हे लढणे म्हणजे ढाल करण्याचे काम आहे की ते खरोखरचे युद्ध आहे?

## गूढतेने वेढलेल्या सैतानाचे कृत्य

बायबलमधील गोष्टी वाचताना नेमकं कोण काय करतय हे ओळखणं फारच कठीण जाते. ही परिस्थिती काही अपघाताने आलेली नाही. सैतान स्वतःला फार सावधपणे झाकून ठेवतो आणि जिथे शक्य तिथे फसवणूक करतो. स्वर्गातसुद्धा देवदूतांना त्याच्या हालचाली समजणे फार कठीण गेले.

त्याच्याकडे जबरदस्त फसवण्याची ताकद होती. खोटेपणाच्या आच्छादनात लपून तो वरचढ झाला होता. त्याची सगळी कृती इतकी रहस्यमय स्वरूपात होती की देवदूतांनाही त्याच्या कामाचे खरे स्वरूप उघड करता येत नव्हते. तोपर्यंत त्याचे बंड पूर्णपणे स्पष्ट होत नाही, तोपर्यंत त्याला खरोखरच वाईट आहे असं दाखवता येत नव्हते; त्याची असमाधानाची भावना बंडखोरी आहे हे देखील स्पष्ट होत नव्हते. अगदी निष्ठावान देवदूतांनाही त्याचा खरा स्वभाव पूर्णपणे समजत नव्हता, की त्याचे कार्य कोणत्या दिशेने जात आहे हे दिसत नव्हते. (Patriarchs and Prophets, पृष्ठ 41.2)

आपल्याला माहीत आहे की सैतान देवावर आपलेच गुण लादण्याचा प्रयत्न करतो. संदेष्टा म्हणतो:

“हे इस्राएला, जो मी तुझा साहाय्यकर्ता त्या माझ्यावर तू उलटलास, त्यामुळे तुझा नाश झाला. तू आपल्या अधर्मामुळे ठोकर खाऊन पडला आहेस.” (होशेय १३:९; १४:१) लोकांच्या दुःखांना बऱ्याच वेळा देवाने थेट ठोठावलेली शिक्षा म्हणून मांडले जाते. अशा प्रकारे तो मोठा फसवणूक करणारा आपले स्वतःचे काम झाकण्याचा प्रयत्न करतो. जेव्हा लोक देवाच्या प्रेमाला आणि दयेला हट्टीपणाने नकार देतात, तेव्हा त्यांनी स्वतःहूनच देवाचे संरक्षण नाकारलेले असते, आणि मग सैतानाला त्यांच्यावर आपल्या इच्छेप्रमाणे राज्य करण्याची मुभा मिळते. (The Great Controversy, पृष्ठ 35)

देवाच्या लोकांची समज अंधारली गेली आहे, कारण सैतानाने देवाच्या स्वभावाचे विकृत चित्र सादर केले आहे. आपल्या चांगुलपणाने आणि दयेने भरलेला प्रभु, लोकांसमोर सैतानाचेच गुणधर्म परिधान केलेल्या रूपात मांडला गेला आहे... (1 Selected Messages, पृष्ठ 235)

कधी कोणते देवदूत काय कृती करत आहेत हे ओळखणं कठीण असल्यामुळे, आपण हे निर्णय देवाच्या स्वभावाबद्दल आपल्याला असलेल्या समजुतीवर आधारित घेतले पाहिजेत. सर्व सामर्थ्य देवाचे आहे आणि त्याच्या संमतीशिवाय या जगात काहीही घडू शकत नाही. सैतानाकडे अशी कोणतीही शक्ती नाही जी देव त्याला वापरू देत नाही. म्हणूनच, सर्व नाश आणि सर्व मृत्यू हे देवाच्या सामर्थ्याच्या कार्यातूनच घडतात.

## चारित्र्य आणि शक्तीचा दैवी नमुना

हे आपल्याला एका अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नापर्यंत घेऊन येते म्हणजे- देवाचा स्वभाव आणि त्याचे सामर्थ्य यांच्यात नेमकं काय नातं आहे? देवाचा स्वभाव त्याच्या सामर्थ्यांद्वारे प्रकट होतो का, की देवाचे सामर्थ्य त्याच्या स्वभावामधून प्रकट होते? माझी आशा आहे की तुम्ही या मुद्द्याचे मोल ओळखाल. या विषयावर अधिक स्पष्ट आणि सखोल समज मिळवण्यासाठी, Divine Pattern of Character and Power हे सादरीकरण maranathamedia.com किंवा youtube.com वर नक्की पाहा. जर आपण देवाची उपासना सामर्थ्य म्हणून करत असू, तर मग बायबलमध्ये सामर्थ्याच्या माध्यमातून घडलेली कृत्येच आपल्याला सांगतील की देव कसा आहे. पण जर आपण देवाची उपासना स्वभाव म्हणून करत असू जो चांगुलपणाने आणि सत्याने परिपूर्ण आहे तर मग प्रत्येक सामर्थ्याची कृती ही त्याच्या स्वभावाचे प्रतिबिंब असेल, आणि ती कृती थेट त्याच्याशी जोडता येईल. पण ज्या कृती त्याच्या स्वभावाशी जुळत नाहीत, त्या अंधाराच्या शक्तींशी संबंधित म्हणून ओळखल्या जातील. म्हणूनच, देवाचा विचार फक्त सामर्थ्यावरून करता येणार नाही. तो वाऱ्यात नाही, तो भूकंपात नाही, तो अग्नीत नाही तर तो त्या शांत, सौम्य आवाजात आहे जो त्याच्या स्वभावातून प्रकट होतो.

बायबलमधील या सर्व कथा आपण कशा समजून घ्यायच्या, हे पूर्णपणे आपण देवाच्या स्वभावाविषयी काय समजतो यावर आधारित असले पाहिजे. स्वभाव हे मूळ आहे, आणि सामर्थ्य हे त्या मूळाचे वाहिनीसारखे आहे. जर आपण देवाचा स्वभाव त्याच्या सामर्थ्यावरून ठरवत असू, तर आपण चुकून वाहिनीलाच मूळ (स्रोत) मानतो, आणि त्याद्वारे आपण देवाच्या स्वभावाचे विकृतीकरण करतो. हा मुद्दा स्पष्टपणे समजण्यासाठी, Divine Pattern of Character and Power हे सादरीकरण पुन्हा एकदा पाहा.

जुन्या करारातील सर्व उतारे वाचताना, खाली काही स्वभाव-आधारित मार्गदर्शक तत्त्वे दिली आहेत, जी आपल्याला त्या शोधात मदत करतील.

निर्गम ३४:५-७ तेव्हा परमेश्वर मेघातून उतरला व तेथे त्याच्याजवळ उभा राहिला, आणि त्याने ‘परमेश्वर’ ह्या नावाची घोषणा केली. परमेश्वराने त्याच्या समोरून जाताना अशी घोषणा केली : “परमेश्वर, परमेश्वर, दयाळू व कृपाळू देव, मंदक्रोध, दयेचा व सत्याचा सागर, हजारो जणांवर दया करणारा, अन्याय, अपराध व पाप ह्यांची क्षमा करणारा, (पण अपराधी जनांची) मुळीच गय न करणारा, असा तो वडिलांच्या दुष्टाईबद्दल पुत्रपौत्रांचा तिसऱ्या व चौथ्या पिढीपर्यंतही समाचार घेतो.”

सैतानाने देवाच्या राज्यव्यवस्थेविरुद्ध मांडलेली विधाने आणि त्याच्याशी एका मताने राहणाऱ्यांचे समर्थन हे देवाविरुद्ध सततचे आरोप होते. त्याच्या कुरकुरींना आणि तक्रारींना काहीही आधार नव्हता, तरीदेखील देवाने त्याला त्याचा सिद्धांत कृतीत आणून दाखवू दिला. देव सैतानाला आणि त्याच्या सर्व सहानुभूती दर्शवणाऱ्यांना जसा कोणी खडूसारखा उचलून जमिनीवर फेकून देतो, तसंच सहज नष्ट करू शकला असता. पण असं केल्यास त्याने बळजबरीने बलप्रयोग करण्यासाठी एक पर्याय मांडला असता. सर्व सक्तीचा आणि जबरदस्तीचा उपयोग फक्त सैतानाच्या राज्यातच केला जातो. प्रभूचे तत्त्वं असे नाहीत. तो कधीही अशा प्रकारे कार्य करत नाही. तो कधीही कोणत्याही मनुष्याला दुसऱ्या मनुष्यावर देवासारखी सत्ता गाजवण्यास, त्याला शारीरिक वा मानसिक वेदना देण्याची मोकळीक असल्याचा इशाराही देत नाही. हे तत्त्व पूर्णपणे सैतानाच्या कल्पनेतून आलेले आहे. (Review and Herald, ७ सप्टेंबर, १८९७)

देव राष्ट्रांशी हिशेब ठेवून असतो. एकही चिमणी त्याच्या लक्षात न येता जमिनीवर पडत नाही. जे लोक आपल्या बांधवांबरोबर वाईट वागतात आणि म्हणतात, "देवाला काय माहीत?" त्यांना एक दिवस खूप काळ लांबलेला न्यायाला सामोरे जावा लागेल. या युगात देवाविषयी सामान्यापेक्षा अधिक अवहेलना आणि तिरस्कार दाखवला जात आहे. लोक गर्व आणि अवज्ञेच्या अशा एका टोकाच्या स्थितीपर्यंत पोहोचले आहेत की त्यांच्या अधर्माचा प्याला जवळजवळ भरून वाहण्यास तयार झाला आहे. बरेच जण आता कृपेच्या सीमारेषेच्या जवळ पोहोचले आहेत, काहींनी ती ओलांडलेली आहे. लवकरच देव दाखवून देईल की तो खरोखरच जिवंत देव आहे. तो आपल्या देवदूतांना म्हणेल, "सैतानाला त्याच्या नाशाच्या प्रयत्नांत यापुढे अडवू नका. त्याला अवज्ञेच्या मुलांवर त्याचा द्वेष आणि निर्दयता व्यक्त करू द्या; कारण त्यांच्या अधर्माचा प्याला पूर्ण भरला आहे. ते एका अधार्मिकतेच्या टप्प्यावरून पुढच्या टप्प्यावर गेले आहेत, दररोज आपल्या पापात वाढ करत आहेत. आता मी नाश करणाऱ्याला त्याचे कार्य करण्यापासून थांबवणार नाही." (Review and Herald, 17 सप्टेंबर, 1901)

म्हणून जेव्हा आपण जाणतो की सैतान विजेसारखा स्वर्गातून कोसळतो आणि कार्य करतो, तेव्हा आपण हे ओळखू शकतो का की जेव्हा तो नाश करण्यासाठी पुढे सरसावतो, तेव्हा त्याला ती कार्य करण्याची शक्ती देवाच्या सिंहासनाकडूनच मिळते आणि म्हणूनच ती बायबलमध्ये "देवाचा न्याय" म्हणून लिहिली जाते? आपण हे देखील समजू शकतो का की सैतानाला जेव्हा देवाच्या विधी आणि न्यायांच्या मर्यादेबाहेर काम करण्याची परवानगी मिळते, तेव्हा अशा शक्तीच्या वापरावरून देवाचा न्याय करता येत नाही?

## आपण कसे ठरवायचे?

नादाब आणि अबीहूच्या कथेकडे परत येताना, प्रेरणा आपल्याला सांगते की परमपवित्र स्थानातून अग्नी आला आणि त्याने या दोघांना भस्म केले. याचा अर्थ असा आहे की नादाब आणि अबीहू मंदिरात राखेत रूपांतरित झाले होते काय? नाही, कारण त्यांना त्यांच्या अंगरख्यात नेण्यात आले होते.

लेवीय १०:४-५ मग अहरोनाचा चुलता उज्जीयेल ह्याचे मुलगे मीशाएल व एलसाफान ह्यांना मोशेने बोलावून सांगितले की, "तुम्ही इकडे येऊन तुमच्या बांधवांना पवित्रस्थानासमोरून उचलून छावणीबाहेर घेऊन जा." मोशेने सांगितल्याप्रमाणे त्यांनी येऊन त्यांच्या अंगरख्यांसहित त्यांना उचलून छावणीबाहेर नेले.

त्यांचे कपडे जळाले होते काय? आपल्याला सांगितले गेले नाही. त्यांची त्वचा जळाली होती काय? आपल्याला सांगितले गेले नाही. प्रभूपासून सामर्थ्य बाहेर आले आणि त्यांना भस्म केले काय? होय, तसे झाले. पण देवाने त्यांना मिसरच्या देवतांप्रमाणे आगीतून पार केले काय, की इस्राएली लोकांनी स्वतःच निवडलेल्या न्यायाच्या तत्त्वांनुसार, ज्यांचा आधार मिसरच्या देवतांच्या शिक्षेवर होता, त्या न्यायाने त्यांच्यावर शिक्षेची वेळ आली? येशूने म्हटल्याप्रमाणे, त्यांच्या स्वतःच्या न्यायाप्रमाणेच त्यांच्यावर न्याय झाला काय? त्यांना विजेचा धक्का बसला असावा काय? हे सर्व कोणी केले? आपल्याला सांगितले गेले नाही. शेवटी, आपण या सामर्थ्याच्या दृश्याचा उपयोग देव नेहमी कशी कृती करतो याचा दाखला म्हणून करायला हवा काय? नाही, कारण देव वाऱ्यात, भूकंपात किंवा अग्नीत नसतो. सोन्याच्या वासराच्या घटनेनंतर देवाने त्यांच्यावरचा आपला संरक्षणाचा हात मागे घेतला काय? होय, त्याने घेतला. या कथा आपण कशाप्रकारे समजून घेतो यामध्ये अतिशय काळजी घ्यायला हवी, कारण आपण ज्या प्रमाणात न्याय करतो, त्याच प्रमाणात आपल्यावर न्याय होईल. जर आपण असा विश्वास ठेवतो की देव दया न करता न्याय करतो, तर हेच तत्त्व आपल्यावर लागू होईल कारण मूर्तिपूजेचे पाप आपल्यावर परत येईल.

## दोन महिला मृत्युच्या सेवेचा खुलासा करतात

बायबलमध्ये असे अनेक उतारे आहेत जे पुन्हा एकदा आपल्याला आपण देवाच्या व्यक्तिमत्त्वाकडे कसे पाहतो याची परीक्षा घेतात. येथे एक उदाहरण आहे:

लेवीय २४:१०-१४ त्या काळी कोणा इस्राएल स्त्रीला मिसरी पुरुषापासून झालेला एक

मुलगा होता; तो इस्राएल लोकांमध्ये गेला, तेव्हा तो आणि एक इस्राएल माणूस छावणीत भांडू लागले. तो इस्राएल स्त्रीचा मुलगा परमेश्वराच्या नावाची निंदा करून शिव्याशाप देऊ लागला तेव्हा त्याला मोशेकडे आणले. त्याच्या आईचे नाव शलोमीथ असे असून ती दान वंशातील दिब्री ह्याची मुलगी होती. त्याच्यासंबंधाने परमेश्वर काय सांगतो ते कळावे म्हणून त्यांनी त्याला अटकेत ठेवले. मग परमेश्वराने मोशेला सांगितले, “तुम्ही त्या शिव्याशाप देणाऱ्याला छावणीबाहेर घेऊन जा आणि जितक्यांनी ती निंदा ऐकली तितक्यांनी आपले हात त्याच्या डोक्यावर ठेवावेत; नंतर सर्व मंडळीने त्याला दगडमार करावा.

देवाची निंदा करणाऱ्या माणसाला छावणीबाहेर घेऊन जा आणि दगडमार करायला परमेश्वराने मोशेला सांगितले. ही कथा अगदी सरळ वाटते. त्या माणसाने पाप केले आणि देवाने त्याला दगडमार करायला सांगितले. म्हणून मोशे आणि इस्राएली लोकांनी असे केले:

लेवीय २४:२३ मोशेने इस्राएल लोकांना हे सांगितले तेव्हा त्यांनी त्या शिव्याशाप देणाऱ्याला छावणीबाहेर नेऊन दगडमार केला. अशा प्रकारे परमेश्वराने मोशेला आज्ञा केल्याप्रमाणे इस्राएल लोकांनी केले.

## कनानी स्त्रीचा विश्वास

ही कथा आपल्याला त्या कनानी स्त्रीसारखीच परीक्षा देते जी आपल्या मुलीला बरे होण्यासाठी ख्रिस्ताकडे मागणी मागण्यासाठी आली होती.

मत्तय १५:२२-२८ आणि पाहा, त्या भागातील एक कनानी बाई येऊन मोठ्याने म्हणू लागली, “अहो प्रभूजी, दाविदाचे पुत्र, माझ्यावर दया करा. माझी मुलगी भुताने फारच जर्जर केली आहे.” तरी त्याने तिला एका शब्दानेही उत्तर दिले नाही. तेव्हा त्याच्या शिष्यांनी जवळ येऊन त्याला विनंती केली, “तिला पाठवून द्या; कारण ती आमच्यामागून ओरडत येत आहे.” त्याने उत्तर दिले, “इस्राएलाच्या घराण्यातील हरवलेल्या मेंढरांखेरीज इतर कोणाकडे मला पाठवलेले नाही.” तेव्हा ती येऊन त्याच्या पाया पडून म्हणाली, “प्रभूजी, मला साहाय्य करा.” त्याने उत्तर दिले, “मुलांची भाकर घेऊन ती घरच्या कुत्र्यांना घालणे हे ठीक नाही!” तिने म्हटले, “खरेच, प्रभूजी; तरी घरची कुत्रीही आपल्या धन्यांच्या मेजावरून पडलेला चुरा खातात.” तेव्हा येशूने तिला उत्तर दिले, “बाई, तुझा विश्वास मोठा, तुझी इच्छा सफळ होवो.” आणि त्याच घटकेस तिची मुलगी बरी झाली.

ती स्त्री येशूकडून दया मागण्यासाठी आली. उत्तरात येशूने नियमशास्त्राच्या तत्त्वांना

तिची परीक्षा घेण्याची परवानगी दिली. ती एक कनानी होती आणि यहूदी लोकांनी कनानी लोकांबद्दल नियमशास्त्रात हे वाचले आहे:

अनुवाद ७:२-६ आणि तुझा देव परमेश्वर त्यांना तुझ्या हवाली करील व तू त्यांचा पराभव करशील, तेव्हा त्यांचा समूळ नाश कर; त्यांच्याशी करारमदार करू नकोस व त्यांच्यावर दया करू नकोस. त्यांच्याशी सोयरीक करू नकोस; आपल्या मुली त्यांच्या मुलांना देऊ नकोस व त्यांच्या मुली आपल्या मुलांना करू नकोस; कारण ते लोक तुझ्या मुलाला माझ्यापासून बहकवतील; आणि अन्य देवांची सेवा करायला लावतील. त्यामुळे तुमच्यावर परमेश्वराचा कोप भडकेल व तो तात्काळ तुमचा नाश करील. त्या लोकांशी तुम्ही अशा प्रकारे वागावे : त्यांच्या वेद्या पाडून टाका, त्यांचे स्तंभ फोडून टाका, त्यांच्या अशेरा मूर्ती तोडून टाका आणि त्यांच्या कोरीव मूर्ती अग्नीत जाळून टाका. कारण तू आपला देव परमेश्वर ह्याची पवित्र प्रजा आहेस, तू त्याची खास प्रजा व्हावेस म्हणून साऱ्या पृथ्वीवरील राष्ट्रांतून तुझा देव परमेश्वर ह्याने तुला निवडून घेतले आहे.

त्या स्त्रीला आठवण करून देताना की त्याला फक्त इस्राएलामध्ये पाठवण्यात आले आहे, तिला आठवण करून दिली जात आहे की ती देवाच्या कृपेच्या बाहेर आहे. त्या स्त्रीने कदाचित तिची मान ताठ केली असती आणि त्याच्यावर ओरडली असती, "तू एक स्व-धार्मिक यहूदी आहेस!" तिने कदाचित त्याच्या शिक्षेच्या सेवेला निराशेने चिरडून टाकू दिले असते. तरीही ती येशू दयाळू आहे या विश्वासाला चिकटून राहिली. ती त्याची शिक्षा लगेच स्वीकारते, त्याच्याशी सहमत होते आणि नंतर त्याच्या दयेला धरून राहते.

मत्तय १५:२७ तिने म्हटले, “खरेच, प्रभूजी; तरी घरची कुत्रीही आपल्या धन्यांच्या मेजावरून पडलेला चुरा खातात.”

त्या महिलेने स्वीकारले की ती अयोग्य आहे पण ख्रिस्ताची दया मिळवण्यासाठी तिने तिचा हात पुढे केला. तिच्यावर पापाची खात्री असूनही आणि तिला आशीर्वादाच्या बाहेर मानले जात असूनही तिने असा विश्वास ठेवला की तो दयाळू आहे. ही मृत्यूची सेवा आहे आणि जेव्हा आपण देवाच्या दयेवर विश्वास ठेवून ते स्वीकारतो, तेव्हा आपल्याला ते मिळेल. विहिरीवरील महिलेसोबतही आपल्याला अशीच प्रक्रिया दिसते.

योहान ४:१५-१८ ती स्त्री त्याला म्हणाली, “महाराज, मला तहान लागू नये व पाणी काढायला मला येथवर येणे भाग पडू नये म्हणून ते पाणी मला द्या.” तो तिला म्हणाला, “तू जाऊन आपल्या नवऱ्याला बोलावून आण.” ती स्त्री म्हणाली, “मला नवरा नाही.” येशूने तिला म्हटले, “मला नवरा नाही हे ठीक बोललीस, कारण तुला पाच नवरे होते आणि आता जो तुझ्याबरोबर आहे तो तुझा नवरा नाही, हे तू खरे सांगितलेस.”

जगाचा तारणारा म्हणून स्वतःला प्रकट करण्यापूर्वी, येशूने तिला तिच्या पापी स्थितीची आठवण करून दिली. त्याने हे तिला लाजवण्यासाठी केले नाही तर तिने पापाची शिक्षा स्वीकारावी म्हणून केले. जेव्हा आपण पापाची शिक्षा स्वीकारतो तेव्हाच आपण दया प्राप्त करण्यास तयार असतो, परंतु जर आपण देव दयाळू आहे असे मानत नसलो तर आपण ते स्वीकारण्यासाठी आपला हात पुढे करणार नाही.

## व्यभिचारी स्त्रीला कसे दगडमार करण्यात आले

व्यभिचार करताना पकडलेल्या स्त्रीच्या कथेत आपण पाहतो की नियमशास्त्राचा निर्माता स्वतः त्याचे नियम कसे अंमलात आणतो.

मोशेने स्वतःहून कोणतेही नियमशास्त्र बनवले नव्हते. ख्रिस्त तो देवदूत ज्याला देवाने आपल्या निवडलेल्या लोकांपुढे चालण्यासाठी नेमले होते त्यानेच मोशेला असे नियमशास्त्र आणि आज्ञा दिल्या ज्या जिवंत धर्मासाठी आणि देवाच्या लोकांच्या शासनासाठी आवश्यक होत्या. — Review and Herald, ६ मे १८७५

येशूने सर्वप्रथम दिलेले उत्तर त्यांच्या संपूर्ण योजनेलाच एक जबरदस्त धक्का होते.

योहान ८:७ आणि ते त्याला एकसारखे विचारत असता तो उठून त्यांना म्हणाला, “तुमच्यामध्ये जो निष्पाप असेल त्याने प्रथम तिच्यावर दगड टाकावा.”

इथे आपण पाहतो की नियमशास्त्र देणाराच आपल्याला सांगतो आहे की दगडफेक करण्यासाठी पात्र कोण ठरतो - तो जो पापवीरहित आहे. मग जुन्या करारातील किती शिक्षा खऱ्या अर्थाने न्यायपूर्वक पार पाडल्या जाऊ शकल्या असत्या, जर शिक्षा अंमलात आणणाऱ्या व्यक्तीला पापरहित असणे आवश्यक ठरले असते? कोणताही मनुष्य स्वतःच्या सामर्थ्यावर हे कृत्य करण्यास पात्र आहे काय? “सर्वांनी पाप केले आहे आणि सर्व देवाच्या महिमेला अपुरे पडले आहेत.” ढोंगीपणापलीकडे, एका पापी व्यक्तीने दुसऱ्या पापीवर शिक्षा अंमलात आणणे अशक्य का आहे?

सैतानाची दोषारोपण करणारी शक्ती त्याला अशी न्यायपद्धती रचायला भाग पाडते जी दयेशी विसंगत असते. तो स्वतःला देवाचा आवाज आणि सामर्थ्य समजतो, आणि म्हणतो की त्याचे निर्णय म्हणजे न्याय, ते शुद्ध आणि निर्दोष आहेत. अशा प्रकारे तो स्वतः न्यायासनावर बसतो आणि आपले सल्ले अचूक असल्याचे घोषित करतो. इथेच त्याचा निर्दयी न्याय पुढे येतो जो न्यायाचा खोटा आणि बनवलेला रूप आहे, आणि जो देवाला अत्यंत अप्रिय आहे. Letter 16a, 1892

जेव्हा आपल्या प्रथम पालकांनी ते फळ खाल्ले आणि सैतानाच्या राज्याच्या तत्त्वांना

स्वीकारले, तेव्हा त्यांनी न्याय व व्यवस्था याबाबत सैतानचाच विचार स्वीकारला. सैतानाच्या न्यायपद्धतीत दयेची कोणतीही जागा नव्हती. सैतान आग्रहाने म्हणाला की प्रत्येक पापाला शिक्षा झालीच पाहिजे. (Desire of Ages, 761.4) सैतानासाठी, "पाप" म्हणजे त्याच्या स्वतःच्या विचारांशी विसंगत असलेली कोणतीही गोष्ट. म्हणून माणसांनी वारशाने ही समजूत अंगीकारली की जे कोणी आपल्याशी असहमत आहेत, त्यांना त्यांच्या गुन्ह्यानुसार निर्दयतेने शिक्षा झालीच पाहिजे. हीच ती कारणे आहेत की इस्राएली लोकांनी मिसरची  दगडफेक करण्याची प्रथा इतक्या सहजतेने स्वीकारली कारण ती शुद्धपणे सैतानाच्या निर्दयी मनोवृत्तीचे प्रतिबिंब होती.

म्हणूनच, एखाद्या पापी व्यक्तीसाठी आपल्या स्वतःच्या कायद्याच्या समजुतीवरून दुसऱ्या माणसाला मृत्युदंड देणे अशक्य आहे. कारण मनुष्य नियमशास्त्राचा वापर अशा लोकांना नष्ट करण्यासाठी करतो, जे त्याच्याशी असहमती दर्शवतात. आणि हेच परुशी येशूविरुद्ध करत होते. त्यांनी मोशेच्या नियमशास्त्राचा वापर ख्रिस्ताला नष्ट करण्यासाठी करण्याचा प्रयत्न केला. हेच ते मूलभूत तत्त्व आहे, जे सैतान देवाच्या विरोधात वापरतो. तो मोशेच्या नियमशास्त्राचा असा वापर करतो की आपल्याला स्वर्गातील आपल्या प्रेमळ पित्याच्या स्वभावावरून विश्वास उडावा. तो हे कसं करतो? एका बनावट न्यायप्रणालीच्या माध्यमातून जिथे माफ करण्यासाठी जागाच नाही.

जेव्हा ती स्त्री येशूच्या पायाशी शिक्षेसाठी आणली गेली, तेव्हा येशूने तिचे पाप उडवून लावले नाही. त्याने म्हटले, "तुमच्यामध्ये जो निष्पाप आहे, त्यानेच तिला आधी दगड मारा." ती स्त्री आपल्या मृत्युदंडाबाबत पूर्णपणे निश्चित होती. पण त्यानंतर जे घडले, तेच येशूने नेहमीपासून त्या प्रत्येक पाप्यांसाठी करण्याचा उद्देश ठेवलेला होता, जे आपल्या पापाची खोली आणि भय प्रामाणिकपणे अनुभवतात.

योहान ८:१०-११:नंतर येशू उठला व त्या स्त्रीशिवाय तेथे कोणी नाही असे पाहून तिला म्हणाला, "बाई, तुला दोष देणारे कोठे आहेत? तुला कोणी दंड ठरवला नाही काय?" ती म्हणाली, "प्रभूजी, कोणी नाही." तेव्हा येशू तिला म्हणाला, "मीही तुला दंड ठरवत नाही; जा; ह्यापुढे पाप करू नकोस.]

नियमशास्त्राचा दोषारोप हा अत्यावश्यक आहे, कारण त्याशिवाय दया दिली जाऊ शकत नाही. जर दोष ठोठावला गेला नाही, तर कृपेची गरजच निर्माण होत नाही; मृत्युदंडाशिवाय दयेसाठी काहीही कारण राहत नाही. आपण हे लक्षात ठेवायला हवं की, स्वर्गाचा दोषारोप मनुष्याच्या दोषारोपासारखा नसतो, कारण देवाचे विचार हे आपल्या विचारांप्रमाणे नसतात. म्हणूनच असे लिहिले आहे:

योहान १:१७ कारण नियमशास्त्र मोशेच्या द्वारे देण्यात आले होते; कृपा व सत्य हे येशू ख्रिस्ताच्या द्वारे आले.

रोमकरांस ५:२०: शिवाय अपराध वाढावा म्हणून नियमशास्त्राचा प्रवेश झाला; तरी जेथे पाप वाढले तेथे कृपा त्यापेक्षा विपुल झाली.

जेव्हा येशूने मोशेला सांगितले की जे व्यभिचार करतात त्यांना मृत्युदंड दिला जावा, तेव्हा त्याचा हेतू असा होता की अशा कृतीमध्ये गुंतल्याचे भयानक परिणाम लोकांच्या समोर स्पष्ट व्हावेत. कारण आपण वाचतो:

याकोब १:१५ मग वासना गर्भवती होऊन पापाला जन्म देते; आणि पाप परिपक्व झाल्यावर मरणास उपजवते.

म्हणजे, मृत्यू हे पापाचे फळ आहे. पाप स्वतःच नाश करणाऱ्या स्वरूपाचे असते. नियमशास्त्रात दिलेली ही आज्ञा पापाचे प्राणघातक स्वरूप अधोरेखित करण्यासाठी होते. पौल आपल्याला सांगतो की हे मृत्युदंडाचे कार्य आहे जे माणसाला दाखवते की तो मृत्युदंडास पात्र आहे आणि हे एक गौरवशाली कार्य आहे.

२ करिंथकरांस ३:७ जिचा लेख दगडांवर कोरलेला असून जिचे पर्यवसान मृत्यूत होत असे ती सेवा एवढी तेजस्वी होती की ‘मोशेच्या चेहऱ्याचे तेज’ नाहीसे होत चालले असूनही इस्राएल लोकांना जर त्याच्या चेहऱ्याकडे टक लावून पाहवेना,

जेव्हा आपण मृत्युदंडाची शिक्षा स्वीकारतो; तेव्हा पवित्र आत्मा आपल्याला दोषी ठरवतो आणि आपण आपल्या पापांवर शोक करतो तेव्हाच आपण देवाची क्षमा आणि दया यांचे आपल्या जीवनात पूर्णपणे स्वागत करण्यास पात्र होतो.

जेव्हा येशूने दगडावर लिहिलेल्या नियमशास्त्राप्रमाणे ती शिक्षा उच्चारली, तेव्हा त्या स्त्रीच्या मनात आयुष्याबद्दलची सर्व आशा मावळली. तिने ती शिक्षा स्वीकारली. पण येशूला तिचे अंतःकरण माहीत होते आणि हेही माहीत होते की तिला या पुरुषांनी एक साधन म्हणून वापरून घेतले आहे म्हणून येशू जाणून होता की ती स्त्री खडकावर (म्हणजे ख्रिस्तावर) पडली आहे.

१ करिंथकरांस १०:४ आणि ते सर्व तेच आध्यात्मिक पाणी प्याले. कारण ते आपल्यामागे चालणाऱ्या आध्यात्मिक खडकातून पीत होते; तो खडक तर ख्रिस्त होता. ह्या गोष्टींविषयी तुम्ही अजाण असावे अशी माझी इच्छा नाही.

मत्तय २१:४४ [जो ह्या धोंड्यावर पडेल त्याचा चुराडा होईल, परंतु ज्या कोणावर हा पडेल त्याचा हा भुगाभुगा करून टाकील.]”

ख्रिस्त येशू या खडकावर स्वतःला झोकून दिल्यामुळे, त्या स्त्रीला ख्रिस्ताच्या इच्छेनुसार खरोखरच “दगडमार” झाला. तिने स्वतःला वाचवण्याची सर्व आशा सोडली आणि स्वतःला पूर्णपणे ख्रिस्ताच्या दयेवर सोपवले. ख्रिस्ताचा हेतू असलेली खरी “दगडमाराची” गोष्ट हीच होती की पाप्यांना त्यांच्या पापांची जाणीव व्हावी आणि ते

दयेची मागणी करू लागावेत. दहा आज्ञा दगडावर कोरल्या गेल्या कारण त्या दाखवतात की नियमशास्त्र आपल्याला आध्यात्मिकदृष्ट्या “दगडमार” करतो आणि आपल्याला मृत्युदंडासाठी दोषी ठरवतो.

रोमकरांस ५:२० शिवाय अपराध वाढावा म्हणून नियमशास्त्राचा प्रवेश झाला; तरी जेथे पाप वाढले तेथे कृपा त्यापेक्षा विपुल झाली.

रोमकरांस ३:१९ आपल्याला ठाऊक आहे की, प्रत्येक तोंड बंद व्हावे व अवघे जग देवासमोर शिक्षेस पात्र ठरावे, म्हणून नियमशास्त्र जे काही सांगते ते शास्त्राधीन असलेल्या लोकांना सांगते.

जे लोक अंतःकरणातील या आध्यात्मिक दगडमाराला नकार देतात, त्यांना अखेरीस त्यांच्या स्वतःच्या विवेकाच्या खडकाखाली चिरडून टाकले जाईल. आणि त्यांनी इतरांना जितकी दया दाखवली असेल, त्याच प्रमाणात ते स्वतःवर न्याय करतील. जेव्हा आपण नियमशास्त्राच्या दात्याला, म्हणजेच येशूला, स्वतःच नियम लागू करू देत नाही, तेव्हा मग सैतान त्या नियमाचा उपयोग आपल्यालाच नष्ट करण्यासाठी करतो. हाच प्रकार यहूदाच्या बाबतीत घडलेला आपण पाहतो:

मत्तय २७:३–५ तेव्हा तो शिक्षापात्र ठरवण्यात आला असे पाहून, त्याला धरून देणारा यहूदा पस्तावला, आणि ते तीस रुपये मुख्य याजक व वडील ह्यांच्याकडे परत आणून म्हणाला, “मी निर्दोष जिवाला धरून देऊन पाप केले आहे.” ते म्हणाले, “त्याचे आम्हांला काय? तुझे तूच पाहून घे.” मग त्याने ते रुपये मंदिरात फेकून दिले व जाऊन गळफास घेतला.

एकदा का एखाद्या व्यक्तीने नियमशास्त्र ख्रिस्ताच्या हातातून काढून घेतला, तर मग त्याला सैतानाच्या निर्दयी दोषारोपांखाली न्यायाला सामोरे जावे लागते आणि हेच त्याला चिरडून टाकते.

येशू, ज्याने मोशेला नियमशास्त्र दिले, त्याने स्पष्ट दाखवून दिले की त्याचा हेतू काय आहे तो नियम कशासाठी वापरायचा होता. त्याचा उद्देश नियमशास्त्राचा उपयोग अशा प्रकारे करणे हा होता की खचलेल्या पाप्याला दया मिळावी. आपण यासाठी आनंद मानू शकतो की येशूच्या दयेच्या माध्यमातून तो दोषारोप करणारा जो आपल्याला निराशतेच्या खाईत ढकलण्याचा प्रयत्न करतो तो आता खाली फेकला गेला आहे.2

प्रकटीकरण १२:१० तेव्हा मी स्वर्गात मोठी वाणी ऐकली; ती म्हणाली, “आता आमच्या देवाने सिद्ध केलेले तारण, त्याचे सामर्थ्य व त्याचे राज्य आणि त्याच्या ख्रिस्ताचा अधिकार हे प्रकट झाले आहेत; कारण आमच्या बंधूंना दोष देणारा, आमच्या देवासमोर रात्रंदिवस त्यांच्यावर दोषारोप करणारा, खाली टाकण्यात आला आहे.

ती गरीब स्त्री, तोंड वर करून तारणाऱ्याच्या चेहऱ्याकडे पाहण्याचीही हिंमत करू शकत नव्हती. ती शांतपणे आपल्यावरील निर्णयाची वाट पाहत होती. तिने स्वतःविरुद्ध दिलेला मृत्युदंड स्वीकारला होता. तिच्या आश्चर्याला पारा राहिला नाही जेव्हा तिने पाहिले की तिचे दोषारोप करणारे लोक काहीही न बोलता गोंधळलेले, लज्जित होऊन एकामागून एक निघून गेले; आणि तेव्हा तिच्या कानावर आशेने भरलेले हे शब्द पडले: "मीही तुला दोषी ठरवत नाही; जा आणि यापुढे पाप करू नकोस." ती स्त्री अंतःकरणातून w. ती येशूच्या पायाशी लोळण घेत पडली, आणि अश्रू प्रेमाने आपली कृतज्ञता व्यक्त करू लागली, कडवट अश्रूंमध्ये आपली पापं कबूल करू लागली. ख्रिस्ताने खरोखरच तिच्या विवेकावर दगडमार केला जेणेकरून ती नवजीवन प्राप्त करू शकेल.

ही तिच्यासाठी नव्या जीवनाची सुरुवात होती एक शुद्धतेचं आणि शांततेचं जीवन, जे देवाच्या सेवेसाठी अर्पण झाले. या पतित आत्म्याला उचलून पुन्हा उभं करताना येशूने असा चमत्कार केला जो सर्वांत गंभीर शारीरिक रोग बरे करण्यापेक्षाही मोठा होता. त्याने त्या आत्म्याचा असा आजार बरा केला जो अनंत मृत्यूपर्यंत घेऊन जाणारा होता. ही पश्चात्तापी स्त्री त्याच्या सर्वांत निष्ठावान अनुयायांपैकी एक बनली. तिने आत्मत्यागाने भरलेले प्रेम आणि निष्ठा यांद्वारे त्याच्या क्षमाशील दयेचे उत्तर दिले. (DA 462.2)

विधीद्वारे पवित्र आत्मा आपल्यात पापाविषयी जे दोषबोधाचे कार्य करतो ते किती विलक्षण आहे जेणेकरून आपण देवाची क्षमा करणारी दया आणि प्रेम स्वीकारू शकू. आपल्या कठोर, निर्दयी मनाला ख्रिस्तासारख्या कोमल हृदयात बदलणे, हा देवाचा चमत्कार किती अद्भुत आहे! आपण बायबलमध्ये ज्या प्रमाणात दोषारोपणाची तीव्रता अनुभवतो, त्याच प्रमाणात आपल्याला क्षमा आणि दया प्राप्त होते.

आता आपण त्या तरुणाच्या कथेकडे परत जाऊ, ज्याला दगड मारून ठार करण्यात आले होते. निंदा या पापासंदर्भात येशू अगदी स्पष्ट शब्दांत सांगतो:

मत्तय १२:३१ ह्यास्तव मी तुम्हांला सांगतो की, प्रत्येक पाप व दुर्भाषण ह्यांची माणसांना क्षमा होईल, परंतु पवित्र आत्म्याविरुद्ध जे दुर्भाषण आहे त्याची क्षमा होणार नाही.

जर त्या तरुणाने क्षमेसाठी विनंती केली असती, तर त्याला क्षमा मिळाली असती. तो जर वध केलेल्या कोकराच्या प्रतीकातून पाप सहन करणाऱ्यावर आपला विश्वास व्यक्त करून, त्याने आपल्या पापाची कबुली दिली असती, तर त्याचे पाप माफ झाले असते. पण त्याने तसं केलं नाही. जेव्हा मोशेने परमेश्वराला विचारले, “काय करावे?”, तेव्हा परमेश्वराने नेहमीप्रमाणे जे केले तेच केले त्याने प्रथम पापाचा दोष दिला. हा दोष मृत्युदंडाच्या स्वरूपात प्रकट झाला. आणि तो आवश्यक होता, कारण त्यानंतरच दया

दाखवता येणार होती. हाच सुवार्तेचा खरा मार्ग आहे.

२ करिंथकरांस ३:६ त्यानेच आम्हांला नव्या कराराचे सेवक होण्यासाठी समर्थ केले; तो करार लेखी नव्हे, तर आध्यात्मिक आहे; कारण लेख जिवे मारतो, परंतु आत्मा जिवंत करतो.

जर तुम्ही ग्रीक मूळ मजकूरात अधिक बारकाईने पाहिलंत, तर तुम्हाला ही क्रमवारी स्पष्टपणे दिसून येईल:

लेख जिवे मारतो, परंतु आत्मा जिवंत करतो.

“परंतु” हा शब्द कधी विरोध दर्शवण्यासाठी वापरला जातो, तर कधी पुढे काही घडण्याचा क्रम दर्शवण्यासाठी. त्यामुळे हे वाक्य असंही लिहिता येईल:

“कारण लेख जिवे मारतो, आणि आत्मा जीवन देतो.”

हाच सुवार्तेचा नेमका मार्ग आहे. लिहिलेला कायदा मृत्युदंड निश्चित करतो, जेणेकरून आपण आपली हरवलेली अवस्था ओळखू शकू. आणि मग आपण देवाच्या दयेने मिळणारा आत्मा प्राप्त करू शकतो, जो जीवन देतो. मृत्युदंडाची घोषणा ऐकल्यानंतर त्या तरुणाने ती दोषारोपणाची शिक्षा स्वीकारली असती, आणि मोशे जो देवाचा प्रतिनिधी होता त्याच्या पायाजवळ गुडघे टेकून त्याला आपल्यासाठी प्रार्थना करण्याची विनंती केली असती, आणि देवाकडे आपली क्षमा मागण्यासाठी त्याच्याकडून विनवणी केली असती, तर देवाने नक्कीच ती प्रार्थना ऐकली असती आणि प्रतिसाद दिला असता. पण त्या तरुणाने हे शक्य आहे, यावर विश्वासच ठेवला नाही. त्यामुळे तो ती कृपा स्वीकारूच शकला नाही. तो आधीच देवाच्या संरक्षणातून बाहेर पडलेला होता. जर देव त्याच्यापासून मागे झाला असता, तर सैतानाने त्याला ताबडतोब ठार केले असते, किंवा त्याचा उपयोग इतरांना देवापासून फसवून दूर नेण्यासाठी केला असता, ज्यामुळे इतरांचाही नाश झाला असता. त्या तरुणाची जिवंत राहण्यासाठी एकच आशा होती की कायदा मृत्युदंडासह पुढे यावा.

इस्राएली लोकांच्या हृदयातील कठोरतेमुळे दगड मारून ठार करण्याची शिक्षा कायद्यात जोडली गेली. लोकांना अशा प्रकारे शिक्षा व्हावी, अशी देवाची इच्छा नव्हती, पण त्यांच्या न्यायाविषयीच्या समजुतीच्या आधारेच देवाने काम केले, जेणेकरून त्यांच्या अंतःकरणात दोषबोध निर्माण व्हावा, आणि ते दया मागतील, अशी आशा होती. पण त्या माणसाने दया मागितलीच नाही, म्हणून तो मरण पावला. किती बरं झाले असते, जर त्याच्यात कनान देशातील स्त्रीसारखा विश्वास असता स्वतःची शिक्षा मान्य करून दयेची विनंती करणारा विश्वास! जर त्याने खरंच हे मान्य केले असते की देव दयाळू आहे, तर त्या दयेने न्यायावर विजय मिळवला असता.

## प्रभूच्या बाजूने कोण आहे?

सोन्याच्या वासराच्या धर्मत्यागानंतर न्याय आणि दयेची ही प्रक्रिया दिसून येते:

निर्गम ३२:२६-२८ तेव्हा मोशे छावणीच्या प्रवेशद्‌वारात उभा राहून म्हणाला, "परमेश्वराच्या पक्षाचा जो कोणी असेल त्याने माझ्याकडे यावे." तेव्हा लेवी वंशातले सर्व लोक त्याच्याजवळ जमा झाले. तो त्यांना म्हणाला, "इस्राएलाचा देव परमेश्वर म्हणतो की, 'तुम्ही प्रत्येकाने आपल्या कंबरेस तलवार लटकवावी आणि छावणीच्या ह्या प्रवेशद्‌वारापासून त्या प्रवेशद्‌वारापर्यंत चहूकडे फिरून आपले बंधू, सोबती व शेजारी ह्यांचा वध करावा."' मोशेच्या सांगण्याप्रमाणे लेवी वंशाच्या लोकांनी केले आणि त्या दिवशी सुमारे तीन हजार लोक पडले.

मोशेने प्रत्येकाला दया निवडण्याचे आमंत्रण दिले त्याच्याकडे येऊन ती स्वीकारण्याचं. भविष्यवाणीच्या आत्म्यामध्ये याविषयी अधिक तपशीलाने असं सांगितलं आहे:

"मोशेने विनंती केली की, ज्यांनी या मोठ्या मूर्तिपूजेच्या पापात भाग घेतलेला नव्हता, त्यांनी येऊन त्याच्या उजव्या हाताकडे उभे राहावे; आणि जे बंडखोरांमध्ये सामील होऊन या मूर्तीची उपासना करण्यात सहभागी झाले होते, परंतु ज्यांनी देवापासून इतक्या लवकर दूर गेल्याबद्‌दल आपल्या पापाचा पश्चात्ताप केला होता, त्यांनी त्याच्या डाव्या हाताकडे उभे राहावे." (1SP 251)

सर्वांनाच क्षमा आणि माफीचा प्रस्ताव देण्यात आला होता जर त्यांनी ती स्वीकारली असती. मोशेने त्या क्षणाच्या आधीच सर्वांसाठी क्षमा मिळवलेली होती. सोन्याच्या वासराची उपासना करताना इस्राएलाने सामूहिकरित्या सैतानालाच आपला नेता मानून स्वीकारले होते. हा धर्मत्याग इतका मोठा होता की, केवळ अतिशय खोलवरचा पश्चात्तापच त्यांना वाचवू शकत होता. त्यांनी आपल्या स्थितीतील भीषण धोक्याची जाणीव करून घेतली पाहिजे होती आणि हे समजणे अत्यावश्यक होते की, जर ठोस बदल झाला नाही, तर राष्ट्राची स्थिती पूर्णपणे आशाहीन आहे, आणि त्याचा उद्‌धार अशक्य आहे. याच टप्प्यावर आपण बायबलमधील येशूच्या एका अत्यंत विचित्र विधानाची आठवण करतो.

मत्तय १८:६-१० माझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या ह्या लहानांतील एकाला जो कोणी अडखळवील त्याच्या गळ्यात मोठ्या जात्याची तळी बांधून त्याला समुद्राच्या खोल पाण्यात बुडवावे ह्यात त्याचे हित आहे. अडखळणांमुळे जगाची केवढी दुर्दशा होणार! अडखळणे तर अवश्य होणार; परंतु ज्या माणसाकडून अडखळण होईल त्याची केवढी दुर्दशा होणार! तुझा हात किंवा तुझा पाय तुला अडखळवत असेल तर तो तोडून फेकून दे; दोन हात किंवा दोन पाय असून सार्वकालिक अग्नीत पडावे ह्यापेक्षा लुळे किंवा

लंगडे होऊन जीवनात जावे हे तुला बरे आहे. तुझा डोळा तुला अडखळवत असेल तर तो उपटून फेकून दे; दोन डोळे असून अग्निनरकात पडावे ह्यापेक्षा एक डोळा असून जीवनात जावे हे तुला बरे आहे. सांभाळा, ह्या लहानातील एकालाही तुच्छ मानू नका; कारण मी तुम्हांला सांगतो, स्वर्गात त्यांचे दिव्यदूत माझ्या स्वर्गातील पित्याचे मुख नित्य पाहतात.

ख्रिस्ताच्या विधानांचा संदर्भ हा मुलांच्या संरक्षणाशी संबंधित आहे. येशू सांगतो की, जर तुझा हात किंवा पाय तुला पाप करायला लावत असेल, तर तो तोडून टाक कारण संपूर्ण शरीराला नरकात टाकले जाण्यापेक्षा अपंग अवस्थेत जीवनात प्रवेश करणे अधिक चांगले आहे. सोन्याच्या वासराच्या प्रकरणात इस्राएलाने जे पाप केले, त्याचा परिणाम असा झाला की जवळपास संपूर्ण इस्राएल राष्ट्र सैतानाच्या नियंत्रणाखाली गुलामगिरी आणि मृत्यूच्या मार्गावर जाऊ लागले. परमेश्वराचे संरक्षण आधीच छावणीतून काढून घेतलेले होते. इस्राएलाने आधीच त्यांच्या न्यायविषयीच्या कल्पना व्यक्त केल्या होत्या त्यांनी मोशेला दगड मारण्याची इच्छा व्यक्त केली होती आणि त्यांनी प्रभूकडून स्पष्ट आदेश न मिळवता अमालेकांवर तलवार चालवली होती. प्रभुने त्यांच्या स्वतःच्या न्यायविषयीच्या समजुतींच्या माध्यमातून काम करत, राष्ट्राला वाचवण्यासाठी, लहान मुलांचे संरक्षण करण्यासाठी आणि सैतानाच्या अधीनतेखाली गेलेल्या देहावरून त्याचे नियंत्रण दूर करण्यासाठी एक अत्यंत तातडीचा प्रयत्न केला. जे लोक प्रभूकडे क्षमा मागण्यासाठी नम्र झाले नाहीत, त्यांनी केवळ सैतानाला स्वतःवर राज्य करू दिले नाही, तर त्यांच्यामार्फत संपूर्ण मंडळीवर सैतानाला हल्ला चढवण्याची संधी दिली. सैतानाने अहरोनाच्या माध्यमातून संघटनेच्या सर्वोच्च पातळीपर्यंत प्रवेश केला होता, आणि जे लोक पश्चात्ताप करण्यास नकार देत होते, त्यांनी सैतानाला आतून संघटनेला नष्ट करत राहण्याची परवानगीच दिली होती तोपर्यंत की अखेरीस कोणीच उरणार नव्हते.

## सामुदायिक जबाबदारी

मवाबाच्या संबंधित धर्मत्यागाच्या प्रसंगीही अशीच एक परिस्थिती निर्माण झाली होती. जेव्हा इस्राएलाच्या सरदारांनी मवाबाच्या स्त्रियांना छावणीत आणले, तेव्हा सैतानाला संपूर्ण छावणीत प्रवेश मिळाला आणि त्याने लोकांना ठार मारायला सुरुवात केली.

गणना २५:६, ९ त्या वेळेस मोशेसमोर व दर्शनमंडपाच्या दाराशी इस्राएलची सर्व मंडळी जमून रडत असताना एका इस्राएली पुरुषाने एक मिद्यानी बाई त्यांच्यासमक्ष आपल्या

भाऊबंदांकडे आणली. तरी मरीने चोवीस हजार लोक मेले.

कारण इस्राएलाच्या घरातील “बलवान पुरुष” (मत्तय १२:२९) म्हणजेच अनेक नेते या गोष्टीत सामील झाले होते, म्हणून सैतानाला छावणीत प्रवेश मिळाला आणि त्याने साथीच्या माध्यमातून नाश घडवला आणि “संपत्ती” लुटून नेली. जर या पुरुषांनी पश्चात्ताप केला असता, तर त्या दुष्टाला प्रवेश गमवावा लागला असता आणि साथ थांबली असती. पण जर त्यांनी पश्चात्ताप केला नाही, तर सैतानाला छावणीत वावरत राहण्याचा अधिकार मिळाला असता आणि मग तो साथीच्या माध्यमातून पुरुष, स्त्रिया आणि लहान मुलांना ठार मारत राहिला असता.

तर मग दया दाखवण्यासारखी गोष्ट नेमकी काय होती? बंडखोर नेते जे पश्चात्ताप करायला नकार देत होते, त्यांना सैतानासाठी माध्यम होऊ द्यावे जेणेकरून सैतान लहान मुलांचाही संहार करत राहील? तुम्ही कल्पना करू शकता काय, की आपला परमपिता अशा स्थितीत आहे की, केवळ या नेत्यांच्या पापांमुळे तो स्वतःच्या मुलांना वाचवू शकत नाही? अशा परिस्थितीत एकच मार्ग उरतो तो म्हणजे दोषारोपाचा तीव्र अनुभव निर्माण व्हावा म्हणून न्यायदंडाची घोषणा केली जावी.

गणना २५:४ आणि परमेश्वर मोशेला म्हणाला, “लोकांच्या सर्व प्रमुखांना पकडून परमेश्वराकरता त्यांना भरदिवसा फाशी दे म्हणजे परमेश्वराचा इस्राएलांवर भडकलेला राग जाईल.”

या शिक्षेची अंमलबजावणी होण्यापूर्वी कोणत्याही क्षणी, या पुरुषांना आपल्यावर मृत्यूदंड ठोठावलेला आहे हे लक्षात येऊन त्यांनी दयेची विनंती करता आली असती. त्यांनी जर हा उपाय स्वीकारला असता, तर सैतानाचे सामर्थ्य थांबवले गेले असते. पण त्यांनी पश्चात्ताप करण्यास नकार दिला, आणि त्यामुळे सैतानासाठी संपूर्ण शरीराचा नाश करण्याचा मार्ग खुला ठेवला. त्यांच्या हट्टी बंडखोरीत कायम राहून त्यांनी स्वतःवरच हा न्यायदंड ओढवून घेतला. ख्रिस्त हा प्रत्येक मनुष्यप्राणी जगात येताना त्याला प्रकाश देणारा “प्रकाश” आहे. म्हणून ख्रिस्ताला सामूहिक शरीरातील स्वतःचाच हात वा पाय छाटावा लागला म्हणजे संपूर्ण शरीर नरकात जाऊ नये म्हणून. एलेन व्हाईट हे असे व्यक्त करतात:

देव आपल्या लोकांचा केवळ सार्वभौम अधिपती नाही, तर रक्षण करणारा पहारेकरीही आहे. तो अशा लोकांना वेगळे करून टाकतो जे बंडखोरीवर ठाम राहतात, जेणेकरून ते इतरांना विनाशाच्या मार्गावर नेणार नाहीत.” काईनाचा जीव वाचवून, देवाने पापाला शिक्षा न दिल्यास काय परिणाम होतो, हे संपूर्ण विश्वासमोर स्पष्ट केले. त्याच्या जीवनाने आणि शिकवणुकीने त्याच्या संततीवर जो परिणाम झाला, त्यातून इतकी भ्रष्ट अवस्था निर्माण झाली की अखेरीस संपूर्ण पृथ्वीचा जलप्रलयाद्वारे नाश करणे आवश्यक ठरले. पूर्वकालीन लोकांचा इतिहास हे सिद्ध करतो की पापी व्यक्तीसाठी

दीर्घायुष्य हे आशीर्वाद ठरत नाही. देवाची मोठी सहनशीलता त्यांचे दुष्टपण थांबवू शकले नाही. जितकं अधिक त्यांना जगायला मिळाले, तितके ते अधिकच भ्रष्ट झाले.

सिनाय पर्वताजवळ झालेल्या धर्मत्यागाबाबतही हेच सत्य लागू होते. जर त्या वेळी त्वरित शिक्षेची अंमलबजावणी झाली नसती, तर पुन्हा तेच परिणाम घडले असते. पृथ्वी पुन्हा एकदा नोहाच्या दिवसांप्रमाणेच भ्रष्ट झाली असती. जर त्या अपराध्यांना वाचवून सोडले गेले असते, तर जे परिणाम काईनाला वाचवल्यामुळे झाले त्यापेक्षा अधिक भयंकर वाईट परिणाम झाले असते. हजारो लोकांनी हे सहन करणे हेच देवाची दया होती कारण त्यामुळे लाखो लोकांवर न्यायाचा कोप ओढवण्याची गरज भासत नाही. अनेकांना वाचवण्यासाठी काहींना शिक्षा देणे आवश्यक ठरते. तसंच, लोकांनी स्वतःहून देवाशी असलेली निष्ठा फेकून दिली होती, त्यामुळे त्यांनी आपले दैवी संरक्षण गमावले होते. जेव्हा त्यांनी आपले संरक्षण गमावले, तेव्हा संपूर्ण राष्ट्र शत्रूंच्या सामर्थ्यासमोर पूर्णतः असुरक्षित बनले. जर ते वाईट तत्काळ दूर केले गेले नसते, तर ते लवकरच आपल्या शक्तिशाली आणि असंख्य शत्रूंना बळी पडले असते. इस्राएलाच्या हितासाठी, आणि पुढील सर्व पिढ्यांसाठी एक कठोर पण आवश्यक शिकवण म्हणून, पापावर त्वरित शिक्षा होणे अत्यावश्यक होते." (Patriarchs and Prophets, पृष्ठ 325–326)

जर इस्राएलाच्या बहुतांश लोकांनी देवाशी निष्ठा राखली असती आणि त्यांनी शिक्षा देण्याच्या बाबतीत मिसरवासीयांचे व्यवहार स्वीकारले नसते, तर मोठ्या संकटांना टाळण्याचे काम इतर मार्गांनीही साध्य होऊ शकले असते. पण या घातक रोगासारख्या परिस्थितीकडे दुर्लक्ष केल्यास अखेर संपूर्ण शरीर नष्ट झाले असते. काहीच न करणे, हे स्वतः पाप करणेच ठरते. यार्देन नदीकाठच्या बंडखोरीच्या प्रसंगातही ही गुंतागुंत दिसून येते. फीनहास, जो याजक होता, त्याने हे दृश्य पाहून हे थांबवण्याचा निर्धार केला.

गणना २५:७-१२ ते पाहून अहरोन याजकाचा नातू, एलाजाराचा मुलगा फीनहास ह्याने मंडळीतून उठून हातात बरची घेतली, आणि तो त्या इस्राएल पुरुषाच्या पाठोपाठ डेऱ्याच्या आतील खोलीत शिरला आणि त्याने त्या उभयतांना, म्हणजे त्या इस्राएल पुरुषाला व त्या बाईला पोटात बरचीने आरपार भोसकले. त्यामुळे इस्राएल लोकांमध्ये पसरलेली मरी थांबली. तरी मरीने चोवीस हजार लोक मेले. मग परमेश्वर मोशेला म्हणाला, "इस्राएल लोकांपैकी अहरोन याजकाचा नातू, एलाजाराचा मुलगा फीनहास ह्याने त्यांच्यामध्ये माझ्या ईर्ष्येने पेटून इस्राएल लोकांवरील माझा संताप दूर केला म्हणून मी आपल्या ईर्ष्येने त्यांचा संहार केला नाही. म्हणून त्याला असे सांग की, मी त्याच्याशी आपला शांतीचा करार करतो.

बंडाचे जे इतर नेते नष्ट करण्यात आले, त्यांनी इस्राएलातील लहान लेकरांच्या नाशासाठी शत्रूला वाट उघडी करून दिली होती. पण झिम्री नावाचा इस्राएलाचा राजकुमार मात्र अजूनही शत्रूसाठी दार उघडे ठेवून होता. जर इस्राएल देवाशी निष्ठावान राहिला असता, तर अशी वेळच आली नसती आणि देव त्यांचे रक्षण करू शकला असता. पण ते देवापासून दूर गेले होते आणि पुन्हा एकदा संपूर्ण समुदाय या बंडखोरांमुळे धोक्यात आला होता.

जेव्हा देवाची मुले स्वतःहून त्याच्या संरक्षणाच्या बाहेर जातात आणि काही जण शत्रूला वाट उघडून देण्यासाठीच ठाम राहतात, तेव्हा आपल्या स्वर्गीय पित्याने काय करायचे? हे केवळ एखाद्याला स्वतःची तत्त्वे उघड करून दाखवण्याचा प्रश्न राहत नाही. संपूर्ण शरीरावर दया दाखवायची असेल, तर गुन्हेगारांवर न्याय करणे आवश्यक ठरते.

जेव्हा लोक एखाद्या व्यक्तीवर पडलेल्या दंडाविषयी विचार करतात, तेव्हा ते फक्त त्या व्यक्तीच्या अनुभवलेल्या परिणामांकडेच लक्ष देतात. पण बहुतेकांना हे समजत नाही की, एखाद्याचे वैयक्तिक पाप हे केवळ त्याच्यावरच नाही तर त्याच्या सभोवतालच्या समाजावरही परिणाम घडवते. उदाहरणार्थ, जेव्हा इस्राएलाने 'आय' या शहराबरोबर युद्ध केले, तेव्हा आयनच्या पापामुळे इस्राएलाचे छत्तीस पुरुष युद्धात मारले गेले (यहोशवा ७:५). त्याचा या युद्धाशी काय संबंध? एका व्यक्तीचे पाप संपूर्ण समूहावर परिणाम करते.

रोमकरांस १४:७ कारण आपल्यातील कोणी स्वतःकरता जगत नाही आणि कोणी स्वतःकरता मरत नाही.

या सगळ्या बाबी विचारात घेतल्यावर, आपण देवाचे प्रेम आणि करुणा त्याच्या मुलांच्या सर्वोत्तम हितासाठी कसे काम करत असते हे पाहतो. ख्रिस्ताने संपूर्ण शरीर वाचवण्यासाठी स्वतःचा हात किंवा पाय तोडून टाकण्यासारखा निर्णय घेतला, हे किती तीव्र दुःखदायक आणि काळजीपूर्वक घेतलेले पाऊल आहे, याची साक्ष देतो एक असा निर्णय जो त्याच्या स्वतःच्या अंतःकरणाला चिरून टाकणारा असतो.

## बेरियन होण्याचे आवाहन

जेव्हा मी वयाच्या पंचविसाव्या सुमारास होतो, तेव्हा मी सिडनीच्या उत्तर उपनगरांतून शहराच्या मध्यभागी कामावर जाण्यासाठी ट्रेनने प्रवास करत असे. त्या प्रवासात मला ट्रेनमध्ये एका स्त्रीशी संवाद साधण्याची संधी मिळाली. काही आठवड्यांपर्यंत आमच्यात चांगल्या चर्चा चालल्या. पण एके दिवशी तिने इतर कोणत्या स्त्रोताकडून ॲडव्हेंटिस्टांचा शब्बाथ आणि श्वापदाची खूण याबाबतचा संदेश ऐकला. पुन्हा जेव्हा

आम्ही भेटलो, तेव्हा तिच्याकडे फक्त एकच प्रश्न होता आणि तो माहिती मिळवण्यासाठी नव्हता, तर फक्त दोषारोप करण्यासाठी होता.

"तू खरंच असं मानतोस का की मी रविवारी उपासना केली, तर माझ्याकडे श्वापदाची खूण आहे?"

मी म्हणालो, "जेव्हा रविवारची उपासना बळजबरीने लादली जाईल, तेव्हाच ती श्वापदाची खूण ठरेल."

"म्हणजे तुला असं वाटते की रविवारी उपासना करणे म्हणजेच श्वापदाची खूण," असं म्हणून तिने माझ्याकडे रोखून पाहिले.

मी म्हणालो, "माझं मन आहे की आपण यावर अजून सविस्तर अभ्यास करूया."

"यावर आता काहीच अभ्यास करायचे उरलेले नाही," ती ठामपणे म्हणाली. "तू मानतोस की रविवार ही श्वापदाची खूण आहे, म्हणजेच हा आपल्या चर्चेचा शेवट आहे "तिने निर्धाराने सांगितले".

मला फार दुःख झाले की आमच्यातली ती चांगली संवादाची सुरुवात तिथेच थांबली, आणि आम्ही पुन्हा कधीच बोललो नाही.

मी हीच चौकशीची, व दोष लावण्याची पद्धत अनेक वेळा अनुभवली आहे.

"तू मानतोस का की येशू निर्माण झालेला आहे?"

"नाही, मी मानतो की येशू हा पित्यापासून उत्पन्न झालेला आहे."

"म्हणजे तू मानतोस की येशू निर्माण केलेला आहे."

"पवित्र आत्मा हा व्यक्तिमत्त्व आहे काय? होय की नाही?"

"मी मानतो की आत्मा हा ख्रिस्ताचाच आत्मा आहे."

"म्हणजे तुझ्या मते आत्मा हा फक्त एक प्रभाव आहे."

"मी या विषयावर तुझ्यासोबत अजून अभ्यास करायला तयार आहे."

"मला हवी ती सगळी उत्तरे मिळाली आहेत, धन्यवाद."

"तू मानतोस का की आपण वाचवले जाण्यासाठी सर्व सण ठेवली पाहिजेत? होय की नाही?"

"मला सण साजरे करण्यात आनंद मिळतो, आणि ते मला आशीर्वाद वाटतात."

"थेट उत्तर दे — ठेवली पाहिजेत की नाही?"

"येशू आणि प्रेषितांनी सण पाळले, आणि मी तुला हे समजावून सांगू शकतो जर तुला

अभ्यास करायची इच्छा असेल."

"मी हा विषय अभ्यासला आहे आणि तो निकाली लागला आहे सण पाळणे म्हणजे कायदेशीरपणा आणि यहोवाचा अपमान. त्यामुळे तू सण पाळून यहोवाचा अपमान करतोस!"

आणि ही चौकशी करणारी वृत्ती देवाच्या स्वभावाच्या विषयातही येते.

"तू मानतोस का की देव लोकांना मारतो? हा सोपा प्रश्न आहे — फक्त उत्तर दे."

"मी तुला सांगू शकतो की मी काय शिकलो आणि काय समजून घेतले."

"तू प्रश्न टाळतोस; सोपा आणि सरळ प्रश्न आहे देव मारतो का नाही?"

"सर्व सामर्थ्य देवाकडून येते, म्हणून पृथ्वीवर जे काही घडते, त्याची जबाबदारी देव घेतो, हे मी मानतो."

"तू सरळ होय/नाही असं उत्तर देत नाहीस. म्हणजे तू मानतोस की देव मारत नाही आणि बायबल तुझ्या मताचा पूर्ण निषेध करतो."

त्याचवेळी उलट विचारले जाते:

"तू मानतोस का की देव लोकांना शिक्षा करतो?"

"बायबल हे स्पष्टपणे शिकवते, पण ही शिक्षा नेमकी कशी घडते हे प्रत्येक वेळेस मला निश्चित सांगता येत नाही."

"देव म्हणजे फक्त प्रेम आहे आणि तो असं काही करतच नाही."

जेव्हा लोक अशा प्रकारचे प्रश्न विचारतात आणि आपल्या स्वतःच्या समजुतीनुसार काळ्या-पांढऱ्या स्वरूपात थेट उत्तराची मागणी करतात, तेव्हा त्यांना खात्री वाटते की त्यांना आधीच सर्व काही माहीत आहे, त्यांना काही उरलेले नाही जाणून घ्यायचे. हीच लाओदिकेच्या अवस्थेची चिन्हं आहेत. प्रभु येशू, आम्हाला नेहमी सत्य शोधण्याची प्रेरणा दे. आम्ही ऐकायला तत्पर राहू, रागावायला हळू राहू, आणि प्रत्येक व्यक्तीशी आमच्या स्वर्गीय पित्याच्या इच्छेनुसार कृपाळूपणे आणि सन्मानाने वागू, अशी कृपा कर.

मला खात्री आहे की माझा स्वर्गीय पिता दयाळू आहे, कृपाशील आहे, भल्यात आणि सत्यात परिपूर्ण आहे, आणि तो दोषीला निरपराध ठरवत नाही. तो पित्यांच्या पापांची शिक्षा त्यांच्या संततीवर तिसऱ्या आणि चौथ्या पिढीपर्यंत देतो. मला हेही माहीत आहे की तो जबरदस्ती करणारा नाही, तो कोमल अंतःकरणाचा आहे, आणि प्रत्येक मनुष्य जे काही पेरतो, त्याचेच फळ तो कापतो. मला माहीत आहे की जे देवावर प्रेम करतात आणि येशूच्या विश्वासाच्या आधारे त्याच्या आज्ञा पाळतात, त्यांच्यासाठी तो सैतान

आणि त्याच्या दूतांपासून रक्षण करणारी एक सुरक्षा भिंत उभी करतो. मला हेही माहीत आहे की शब्बाथ हे देवाच्या लोकांसाठी महान आशीर्वाद आणि रक्षण आहेत. माझा देव माझा रक्षक आहे, आणि कधी कधी आपल्या मुलांचे रक्षण करण्यासाठी त्याला अत्यंत कठोर निर्णय घ्यावे लागतात पण मला त्याच्यावर विश्वास आहे की त्याला सर्वात उत्तम काय आहे हे माहित आहे. माझा पिता दयाळू आहे, आणि म्हणूनच मला खात्री आहे की तो नेहमी माझ्यावर दया करेल. मी काईनासारखं रडत नाही, “माझं पाप एवढं मोठं आहे की त्याला क्षमा होणार नाही!” मला ठामपणे माहीत आहे की माझा उद्धारकर्ता जिवंत आहे, आणि देवाविषयी असलेला अंधार व गैरसमज आता त्याच्या अमूल्य स्वभावाच्या प्रकाशात दूर होत आहे.

या संदेशामध्ये आपल्याला जगाला दिल्या जाणाऱ्या अंतिम दयेच्या संदेशाला प्रतिसाद देण्यासाठी आमंत्रण दिले जात आहे. हे जग दयेची गरज असलेला आहे, पण आपण पाहतो की जग स्वतःच स्वतःचा न्याय करतो आणि तेही दया न करता.

देवाविषयीच्या गैरसमजुतींचा अंधार संपूर्ण जगावर पसरलेला आहे. माणसे त्याच्या स्वभावाचे ज्ञान गमावत चालली आहेत. त्याचा स्वभाव चुकीच्या पद्धतीने समजला गेला आहे आणि चुकीच्या प्रकारे मांडला गेला आहे. अशा वेळी देवाकडून एक संदेश घोषित केला जाणार आहे असा संदेश जो आपल्या प्रभावाने प्रकाशित करणारा आणि आपल्या सामर्थ्याने उद्धार करणारा आहे. देवाचा स्वभाव जगासमोर उघड केला जाणार आहे. या जगाच्या अंधारात त्याच्या गौरवाचा प्रकाश झळकवला जाणार आहे त्याच्या चांगुलपणाचा, दयेचा आणि सत्याचा प्रकाश.

याच कार्याचे वर्णन यशया भविष्यवक्ता पुढील शब्दांत करतो: सीयोनेस सुवार्ता सांगणारे, उंच डोंगरावर चढ; यरुशलेमेस सुवार्ता सांगणारे, आपला स्वर जोराने उंच कर; कर उंच, भिऊ नकोस; यहूदाच्या नगरांना म्हण, “तुमचा देव पाहा.” पाहा, प्रभू परमेश्वर पराक्रम्यासारखा येत आहे; त्याचा भुज त्याचे प्रभुत्व चालवील; पाहा, वेतन त्याच्याजवळ आहे, व प्रतिफळ त्याच्या हाती आहे. यशया ४०:९,१०

जे वराच्या येण्याची वाट पाहत आहेत, त्यांनी लोकांना सांगायचे आहे: “तुमचा देव पाहा!” दयाळूपणाच्या अंतिम प्रकाशकिरणांप्रमाणे, जगाला दिला जाणारा शेवटचा दयेचा संदेश म्हणजे देवाच्या प्रेममय स्वभावाचे प्रकटीकरण आहे. देवाची मुले त्याच्या तेजाचा प्रकाश पसरवतील. त्यांच्या स्वतःच्या जीवनात आणि स्वभावात, देवाच्या कृपेने त्यांच्यासाठी काय घडवून आणले आहे, हे ते उघड करून दाखवतील. Christ’s Object Lessons, पृष्ठ 415

मत्तय ७:१-३ तुमचे दोष काढण्यात येऊ नयेत म्हणून तुम्ही कोणाचे दोष काढू नका. कारण ज्या प्रकारे तुम्ही दोष काढाल त्या प्रकारेच तुमचे दोष काढण्यात येतील आणि ज्या मापाने तुम्ही मापून द्याल त्याच मापाने तुम्हांला मापून देण्यात येईल. तू

आपल्या डोळ्यातले मुसळ ध्यानात न आणता आपल्या भावाच्या डोळ्यातले कुसळ का पाहतोस?

मी तुम्हाला हे प्रश्न काळजीपूर्वक अभ्यासण्याचे आमंत्रण देतो. आपला स्वर्गीय पिता खरोखर कोण आहे? त्याचा स्वभाव नेमका कसा आहे? तोराहमध्ये जसं लिहिलं आहे, तसं लोकांना प्रत्यक्ष दगडफेक करून ठार मारण्याचा निर्णय देवाने स्वतः घेतला होता काय? की त्याने आपल्या लोकांना त्यांच्या मिसरदेशीय विचारसरणीनुसार जी योग्य नव्हती अशी एक न्यायव्यवस्था ठेवू दिली? त्याने दया न करणाऱ्यांसाठी दयाविरहित न्यायाची परवानगी दिली काय?

ह्याचा तुम्हीच न्याय ठरवा.

# मिसराचे देव

# स्वर्गातून येणाऱ्या वीजासारखे

बायबलमध्ये अनेक ठिकाणी लोकांना त्यांच्या अपराधांसाठी दगडफेक करून ठार मारण्याची शिक्षा सुनावल्याची उदाहरणे आहेत. ही प्रथा कुठून आली? ही कल्पना देवाने मोशेला दिली होती काय? की ती कुठल्या दुसऱ्या स्रोतातून आली होती?

मग अशा उताऱ्यांबद्दल काय म्हणायचं?

गणना ११:१ मग लोक संकटात सापडल्यासारखे कुरकुर करू लागले; ते परमेश्वराच्या कानी पडले. ते ऐकून परमेश्वराचा कोप भडकला आणि त्याच्या अग्नीने त्यांच्यामध्ये पेट घेऊन छावणीच्या हद्दीवरचे काही भाग भस्म केले.

आपण या गोष्टी एका प्रेमळ देवाशी कशा जोडून समजावून घ्यायच्या? येशूने आपल्याला सांगितले:

मत्तय ७:२ कारण ज्या प्रकारे तुम्ही दोष काढाल त्या प्रकारेच तुमचे दोष काढण्यात येतील आणि ज्या मापाने तुम्ही मापून द्याल त्याच मापाने तुम्हांला मापून देण्यात येईल.

हे शक्य आहे का की इस्राएलावर जे दंड आले ते त्यांच्याच न्यायविषयक कल्पनांशी संबंधित होते आणि ते प्रत्यक्षात देवाकडून नव्हते? सोन्याच्या वासराच्या पापामुळे देव आणि इस्राएली लोक यांच्यातील नातेसंबंधात काही बदल झाले काय? हे समजणे महत्त्वाचे आहे काय? ज्याच्याकडे कान आहेत, त्याने ऐकावे.